महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशनः मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

मूल्य २/- रुपये

• संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १५, अंकः १४, पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार २ जुलै २०२४ ते सोमवार ८ जुलै २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

# मुंबईत शिवसेना उबाठाच! पदवीधर मतदारसंघात अनिल परब विजयी, तर कोकणचा गड भाजपाच्या डावखरेंनी राखला



विधानपरिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीचा निकाल समोर येत आहे. मुंबईतील पदवीधर, शिक्षक, कोकण पदवीधर आणि नाशिक शिक्षक मतदारसंघ अशा चार मतदारसंघात ही निवडणूक झाली होती. मुंबई पदवीधर निवडणुकीत शिवसेना उबाठा गटाचे उमेदवार अनिल परब आणि भाजपाचे उमेदवार किरण शेलार यांच्यात थेट लढत होती. अनिल पराब यांचा मोठा मताधिक्याने विजय झाल्याची माहिती शिवसनेच्या गोटातून समोर येत आहे. तर कोकण पदवीधर मतदारसंघात भाजपाच्या निरंजन डावखरे यांनी तिसऱ्यांदा विजय मिळवत आपला गड कायम राखल्याचे सांगितले जात आहे.

■ मुंबईः विशाल कारंडे

मुंबई पदवीधर मतदारसंघात दीड लाखांच्या आसपास मतदार आहेत. गेली ३० वर्षे शिवसेनेच्या ताब्यात असलेला हा मतदारसंघ कायम ठेवण्याचे ठाकरे गटापुढे मोठे आव्हान होते. यंदा भाजपचे किरण शेलार यांच्यासाठी भाजपने मुंबईतील आपली सर्व यंत्रणा कामाला लावली. मात्र त्यात त्यांना यश मिळू शकले नाही. मुंबई शिक्षक मतदारसंघात लोकभारतीचे सुभाष मोरे, शिवसेना ठाकरे गटाचे ज. मो. अभ्यंकर, भाजप पुरस्कृत शिवनाथ दराडे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शिवाजीराव नलावडे, शिंदे गटाचे शिवाजी शेंडगे हे रिंगणात आहेत. सुमारे १५ हजार मतदार असलेल्या या मतदारसंघात जास्त नोंदणी केलेल्या उमेदवाराला विजयाची नेहमी संधी असते. कोकण पदवीधर मतदारसंघात भाजपचे विद्यामान आमदार निरंजन डावखरे आणि काँग्रेसचे रमेश कीर यांच्यात लढत झाली. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अशा पाच जिल्ह्यांमध्ये पसरलेल्या या मतदारसंघात सुमारे सव्वा दोन लाख मतदार आहेत. (शेष पृष्ठ ४ वर)

## संक्षिप्त

### 'केंद्र सरकारने मराठा समाजाला आरक्षण द्यावं', लोकसभेतील पहिल्याच भाषणात अमोल कोल्हेंची मागणी

■ नवी दिल्लीः वृत्तसंस्था

केंद्र सरकारने लवकरात लवकर जाती आधारित जनगणना करावी तसेच इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला हात न लावता मराठा समाजाला आरक्षण द्यावं, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) खासदार अमोल कोल्हे यांनी लोकसभेत केली आहे. तसेच त्यांनी विकासाच्या मुद्द्यावरून केंद्र सरकारलाही लक्ष्य केलं



आहे. ते आज राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बोलत होते. 'महाराष्ट्रात सध्या आरक्षणाचा मुद्दा चर्चेत आहे. मराठा आरक्षणावरून राज्यात मोठा आक्रोश आहे. दुसरीकडे ओबीसींमध्येही आरक्षणावरून चिंता आहे. त्यामुळे माझी सरकारला विनंती आहे की सरकारने जाती आधारित जनगणना करावी तसेच इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला हात न लावता मराठा समाजाला आरक्षण द्यावं', असं अमोल कोल्हे म्हणाले. पुढे बोलताना त्यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरून केंद्र सरकारवर टीकाही केली.

### दरडोई उत्पन्नात महाराष्ट्र देशात सहाव्या स्थानी; तेलंगणा, कर्नाटक, हरयाणा आघाडीवर

■ मुंबईः माधव अलवा

वस्तू व सेवा कर आकारणी, थेट विदेशी गुंतवणूक आदी क्षेत्रांमध्ये आघाडीवर असलेले महाराष्ट्र राज्य हे दरडोई राज्य उत्पन्नात देशात सहाव्या क्रमांकावरील राज्य आहे. तेलंगणा, कर्नाटक, हरयाणा आदी राज्यांनी महाराष्ट्राला मागे टाकले आहे. राज्याचे २०२२-२३ मध्ये दरडोई उत्पन्न २ लाख, ५२ हजार ३८९ कोटी अपेक्षित धरण्यात



आले आहे. २०२१-२२ मध्ये हेच उत्पन्न २ लाख, १५ हजार ५७३ कोटी रुपये होते. २०२१-२२ मध्ये देशात दरडोई उत्पन्नात महाराष्ट्र पाचव्या क्रमांकावरील राज्य होते. सरत्या आर्थिक वर्षात गुजरात राज्याने मागे टाकल्याने महाराष्ट्र सहाव्या क्रमांकावरील राज्य ठरले आहे. तेलंगणा, कर्नाटक, तमिळनाडू ही दक्षिणेकडील राज्ये महाराष्ट्रापेक्षा पुढे आहेत. राज्यात मुंबई (४,१२,६९० कोटी), ठाणे जिल्हा (३,५३,२९९कोटी), पुणे जिल्हा (३,३६,५०३ कोटी), नागपूर जिल्हा (२,९२,६०७ कोटी), रायगड जिल्हा (२,८७,३९७ कोटी), नाशिक जिल्हा(२,३०,६१६), छत्रपती संभाजीनगर (२,०८,३६६ कोटी).

## 'भाजपात जुम्मा-जुम्मा चार दिवस झालेला माणूस मला...', सभागृहातील राड्यानंतर अंबादास दानवेंचा प्रसाद लाडांवर हल्लाबोल

■ मुंबईः सम्यक कासारे

विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन चालू असून विधान परिषदेत सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या आमदारांमध्ये मोठा राडा झाल्याचं पाहायला मिळालं. वरिष्ठ सभागृहात आमदारांनी शिवीगाळ करून सभागृहाला डाग लावण्याचा प्रयत्न केला. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी भाजपा आमदार प्रसाद लाड यांच्यावर खालच्या पातळीवर जाऊन टीका केली, तसेच शिवीगाळही केली. त्यानंतर प्रसाद लाड यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, 'दानवे यांनी माझ्याशी गैरव्यवहार करत मला आई-बहिणीवरुन शिवीगाळ केली. अंबादास दानवे यांनी सभागृहाची माफी मागावी.' त्याचबरोबर भाजपाने दानवे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.'



प्रसाद लाड म्हणाले, 'राहुल गांधी यांनी लोकसभेत हिंदुत्वाबाबत जे वक्तव्य केलं त्यावर विधान परिषदेत बोलताना मी राहुल गांधींच्या निषेधाचा ठराव मांडला. तसेच तो ठराव लोकसभेत पाठवावा, अशी मागणी केली. त्यावर विरोधी पक्षनेत्यांनी उत्तर द्यावं, अशी मागणीही मी केली. त्यानंतर दानवे उत्तर देण्यासाठी उभे राहिले आणि त्यांनी मला आई बहिणीवरुन शिवीगाळ केली,' दरम्यान, सभागृहात जे काही घडलं त्यावर आणि प्रसाद लाड यांच्या आरोपांवर अंबादास दानवे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. दानवे यांनी विधीमंडळ परिसरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, माझा काही तोल सुटलेला नाही. मी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा कट्टर शिवसैनिक आहे. त्यामुळे माझ्यावर कोणी बोट उचललं तर ते बोट तोडायची ताकद माझ्या मनगटात आहे. सभागृहात माझा तोल सुटला नाही. (शेष पृष्ठ ४ वर)

## 'मोदीजी लिहून घ्या...', राहुल गांधींचं भर सभागृहात पंतप्रधानांना आव्हान

■ नवी दिल्लीः प्रगती शर्मा

नवी दिल्लीत १८ व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन चालू असून आज (१ जुलै) या अधिवेशनाचा सहावा दिवस आहे. पहिल्या अधिवेशनात राष्ट्रपदी द्रौपदी मुर्मू यांनी केलेल्या अभिभाषणावर आज सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये चर्चा चालू आहे. दरम्यान, आजचा दिवस हा विरोधी पक्षातील खासदारांचा असल्याचं दिसत आहे. कारण विरोधकांनी ऩ्ऊ पेपर लीक प्रकरणावरून सरकारला घेरलं. पाठोपाठ विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी हिंदुत्वाचा मुद्दा, नुकतीच झालेली लोकसभा निवडणूक, अग्निवीर योजनेला देशभरातून होत असलेला विरोध, ईडी-सीबीआय व आयकर विभागाच्या धाडी तसेच इतर अनेक मुद्द्यांवरून सरकारला धारेवर धरलं. यावेळी राहुल गांधी यांनी भर सभागृहात पंतप्रधान नरेंद्र मोदी, भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (एनडीए) आगामी गुजरात विधानसभा निवडणुकीत पराभूत करण्याचं आव्हान दिलं. राहुल गांधी म्हणाले, मोदीजी यावेळी आम्ही तुम्हाला गुजरातमध्ये हरवणार, तुम्ही हवं तर लिहून



घ्या, विरोधकांची इंडिया आघाडी तुम्हाला गुजरातमध्ये हरवतेय. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुकीचा प्रचार करत असताना अनेक वृत्तवाहिन्या व वृत्तसंस्थांना मुलाखती दिल्या होत्या. (शेष पृष्ठ ४ वर)

## फेरीवाल्यांची पळता भुई! सीएसएमटी, दादर, बोरिवली परिसर फेरीवालामुक्त

■ मुंबईः प्रथमेश चव्हाण

फेरीवालामुक्त फुटपाथ यासाठी बेकायदा फेरीवाल्यांची धरपकड सुरू केली आहे. पालिकेच्या २४ वॉर्डात २८ ते ३० जून या तीन दिवसांत विशेष मोहीम राबवत सीएसएमटी, दादर, बोरिवली, कुलाबा, कुर्ला आदी परिसरातील ५३८ बेकायदा फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात आल्याने हे परिसरांनी मोकळा श्वास घेतला. दरम्यान, कारवाईच्या वेळी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पदपथ आणि रस्त्यांचा वापर करताना अडथळा ठरणारे फेरीवाले, पथारीवाले तसेच आरोग्यासाठी अपायकारक अशा पद्धतीने उघड्यावर अन्न पदार्थांची विक्री करणाऱ्या फेरीवाल्यांविरोधात कारवाई करण्यात येते. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, अनाधिकृत फेरीवाले, बेवारस वाहने, पदपथावरील अतिक्रमणे यावर अधिक कठोर करावी, असे निर्देश पालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत.



त्यानुसार अतिरिक्त आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई अधिक तीव्र करण्यात आली आहे. २८ ते ३० जून दरम्यान करण्यात आलेल्या कारवाईमध्ये 'ए' विभागातील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते उच्च न्यायालय, चर्चगेट ते उच्च न्यायालय, कुलाबा (शेष पृष्ठ ४ वर)

## मुंबईकरांचा प्रवास आता आरामदायी होणार; रेल्वेमंत्र्यांनी लोकलसंदर्भात दिल्या महत्त्वाच्या सूचना

■ मुंबईः राकेश गायकवाड


मुंबई लोकलही मुंबईकरांची लाइफलाइन आहे. लाखो लोक लोकलमधून प्रवास करतात. दिवसेंदिवस लोकलची गर्दी वाढत चालली आहे. अनेकदा लोकलमधून पडून अपघात घडल्याच्या घटना घडल्या आहेत.


लोकलची गर्दी कमी करण्यासाठी फेऱ्या वाढवण्याची मागणी वारंवार केली जाते. आता ही मागणी लवकरच पूर्ण होण्याची शक्यता आहे. लोकलमधून लाखो प्रवासी प्रवास करत असतात. गर्दीमुळं अनेकदा प्रवाशांना नीट उभं राहण्यासाठीही जागा नसते. मुंबईकरांचा लोकल प्रवास सुलभ व्हावा यासाठी प्रशासनाकडून अनेक उपाययोजना आखण्यात येत असतात. रेल्वेने १५ डब्यांच्या गाड्या सोडल्या आहेत. मात्र तरीही गर्दी तसूभरही कमी होत नाही. मध्य रेल्वेवरील कल्याण-डोंबिवली तसंच, पश्चिम रेल्वेवरील वसई-विरार येथे मोठ्या प्रमाणात गर्दी असते. इथून सुटणाऱ्या लोकलमध्ये प्रवाशांना उभं राहण्यासही जागा



नसते. त्यामुळं वसई-विरार येथून लोकलच्या फेऱ्या वाढवण्याची मागणी होत आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना मुंबी लोकल फेऱ्यात वाढ करण्याच्या सूचना दिल्या आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी रेल्वे प्रशासनाला लोकलच्या फेऱ्या वाढवण्याच्या सूचना केल्या आहेत. त्याचबरोबर दैनंदिन फेऱ्या कशा वाढवण्यात येतील यावर काम करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. रेल्वेमंत्र्यांच्या सूचनेनंतर आता लवकरच मुंबई लोकलच्या फेऱ्या वाढणार आहेत, अशी माहिती कळतंय. त्यामुळं लवकरच आता मुंबईकरांचा प्रवास सुखाचा होणार आहे. लोकलमधून पडून अनेकांनी जीव गमावला होता. या वारंवार होणाऱ्या अपघातामुळं हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. रेल्वेनंत्री अश्विनी वैष्णव हे मुंबई दौऱ्यावर आहेत. त्यावेळी त्यांनी मान्सूनच्या तयाराचा आढावा घेतला होता. मध्य रेल्वेचे लोकलचे आणि एक्स्प्रेसचे वेळापत्रक बिघडल्याचे चित्र होते.

(शेष पृष्ठ ४ वर)




# विळखा पडतो आहे...

अमली पदार्थांची तस्करी आणि सेवन यांचे संकट आपल्या अंगणात येऊन ठेपले आहे. पुणे शहरात २०२१ मध्ये पोलिसांनी अडीच कोटी रुपये किंमतीचे अमली पदार्थ जप्त केले होते, तर चालू वर्षाच्या सहा महिन्यांत तब्बल साडेतीन हजार कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त केल्याने त्याचा विळखा किती घट्ट होत आहे, हे दिसते. आता अचानक अमली पदार्थ विकणाऱ्यांच्या बांधकामांवर हातोडे चालत आहेत, बुलडोझरही फिरत आहेत.

सरकार या प्रश्नाबाबत सक्रिय झाल्याचा दृश्यात्मक परिणाम यातून साधला जातही असेल. या प्रश्नाच्या तळामुळाशी जाऊन उपाययोजना केल्याशिवाय तो सुटणार नाही, याचीही जाणीव ठेवावी. इतके दिवस संबंधित यंत्रणा काय करीत होत्या, या प्रश्नाचे उत्तरही मिळायला हवे. ससून रुग्णालयातून अमली पदार्थांच्या तस्करीचे रॅकेट चालविणाऱ्या ड्रग माफिया ललित पाटील प्रकरणाची राज्यभरात चर्चा झाली.

त्यानंतर पुण्यासह कुरकुंभ औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यातून ११०० कोटींचे मेफेड्रोन (एमडी) जप्त करण्यात आले. अगदी अलीकडे पुण्याच्या नामदार गोखले रस्त्यावरील एल-३ पबमध्ये मद्यपार्टीत काही तरुण ड्रग सेवन करीत असल्याचे आढळून आले. सांस्कृतिक, शैक्षणिक, औद्योगिक वारसा जपणाऱ्या पुणे शहराच्या प्रतिमेला काहीसा धक्का आहे.



अर्थात या घटनांवरून संपूर्ण शहरच अमली पदार्थांच्या विळख्यात अडकले आहे, अशी प्रतिमा निर्माण करणे गैर आहे. संयुक्त राष्ट्रांनी दरवर्षी २६ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ सेवनविरोधी दिवस म्हणून घोषित केला होता. त्यानुसार आयोजिलेल्या 'नशामुक्त पंधरवड्या'च्या काळातच पब-बारमध्ये काही तरुण ड्रग सेवन करतानाचा व्हिडिओ समाजमाध्यमातून प्रसारित झाला आणि खळबळ माजली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुणे, पिंपरी-चिंचवड शहर आणि जिल्ह्यातील अनधिकृत पब, बार हॉटेलवर बुलडोझर चालविण्याचे आदेश दिले. पोलिस, राज्य उत्पादनशुल्क, महापालिका, पीएमआरडीए, जिल्हा प्रशासनाने अनधिकृत पब बार, हॉटेलवर कारवाई सुरू केली. एकाच रात्रीत हे घडले. मग इतके दिवस त्याबाबत या यंत्रणा गप्प का होत्या? त्यांचे हात कोणी बांधले होते? शहरात गांजा, अफू, मेफेड्रोन अशा अमली पदार्थांची तस्करी कोठून व कशी होते, याची माहिती पोलिस यंत्रणेतील अधिकारी कर्मचाऱ्यांना असणारच.

पोलिस आणि राज्य उत्पादन शुल्कच्या अधिकाऱ्यांनी आता ड्रग्ज माफियांच्या तस्करीचा फास आवळण्याची गरज आहे. ज्या दिवशी एल-३ पबमध्ये पहाटेपर्यंत मद्यपार्टी सुरू होती, त्यादिवशी गस्तीवरील पोलिस बीट मार्शलनी कामात कुचराई केली. पोलिस आयुक्तांनी त्या दोघांसह पोलिस निरीक्षक आणि सहाय्यक निरीक्षकालाही निलंबित केले.अशी शिक्षा झालीच पाहिजे, यात शंका नाही. परंतु अनेकदा पोलिस कर्मचाऱ्यांना दबावाखाली काम करावे लागते. त्यांच्या कामात होणाऱ्या हस्तक्षेपाचे काय? आपल्याकडे लोकांच्या प्रक्षोभाचा उद्रेक झाला, की यंत्रणा थोड्याफार हलू लागतात; एरवी त्या सुस्तावलेल्या असतात. त्याचाच फायदा माफिया उठवतात. त्यामुळे केवळ वरवरची कारवाई करून हा विळखा दूर होणार नाही. भ्रष्टाचाराने पोखरलेल्या व्यवस्थेतील फटी माफियांच्या पथ्यावर पडतात. या फटी आणि त्रुटींवर कायमस्वरुपी जालीम मात्र चालवण्याची वेळ आली आहे.

मुळात अमली पदार्थांच्या रोगाची व्याप्ती एखाद्या शहरापुरती सीमित नाही. त्यामुळेच त्याविरुद्ध लढताना विविध पातळयांवरचा समन्वय आणि प्रखर इच्छाशक्ती आवश्यक आहे. अफगाणिस्तान हा जगातील सर्वात मोठा अफूउत्पादक देश. त्यामुळे दक्षिण आशियात अफूचा वापर वाढला आहे. पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधून गुजरात, पंजाबसह अन्य राज्यांत हेरॉईनची तस्करी होते.

भारतातून पुढे दक्षिण आशिया, युरोप आणि अमेरिका खंडातील शेजारील देशांमध्ये तस्करी होते. नेपाळच्या सीमेवरून भारतात बहुतांश गांजाची तस्करी होते; तर अमेरिका आणि युरोपमधून भारतात कोकेनची तस्करी वाढली आहे. गांजा, मारिजुआना, चरस, मॉर्फिन, कोडीन, कोकेन, ॲम्फेटामाइन, मेथॅम्फेटामाइन, एलएसडी, मेफेड्रोन, म्याऊ म्याऊ अशा अमली पदार्थांचा वापर वाढला आहे. त्याचे भयानक घातक परिणाम आहेत.

तरुण पिढीतील काही जण त्याच्या आहारी गेले तर त्यांची आयुष्ये तर उद्ध्वस्त होतातच, पण समाजजीवनालाही वाळवी लागते. ड्रग्ज तस्करांचे नेटवर्क नष्ट करण्यासाठी कायद्याची कार्यक्षम अंमलबजावणी केली पाहिजे. नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो (एनसीबी) ही सर्वोच्च समन्वय संस्था आहे. मुंबईसह प्रमुख शहरांत विभागीय कार्यालये आहेत. मागील दोन वर्षांपासून शहरातील ड्रग माफियांच्या वाढत्या कारवाया पाहता पुण्यातही 'एनसीबी'चे विभागीय कार्यालय गरजेचे आहे. केंद्र आणि राज्य सरकार, तसेच 'एनसीबी', पोलिस, सीमाशुल्क आणि इतर संबंधित यंत्रणांना अधिक समन्वयाने काम करावे लागणार आहे. अर्थात त्याबरोबरच सामाजिक पातळीवरही या संकटाचा मुकाबला कसा करता येईल, याचाही विचार व्हावा.

# जगातून लुप्त झालेले १० अनमोल खजिने!!

एखादी मौल्यवान वस्तू हरवली किंवा नष्ट झाली तर आपल्याला त्याचे वाईट वाटते. आयुष्यभर खंत वाटत राहते. पण मानवजातीच्या इतिहासात आणि काळाच्या ओघात असे अनेक खजिने हरवले किंवा नष्ट झाले आहेत ज्यांचे मूल्य सुद्धा करता येणार नाही. हे अमूल्य खजिने एक वैभवशाली ठेवा होते जे आता आपल्याला परत मिळणार नाहीत अथवा त्यांच्या सापडण्याची शक्यता अगदी थोडी आहे. हे खजिने कोणते माहीत आहे? चला तर मग जाणून घेऊया...

### १. कॅथरीन पॅलेस:

अठराव्या शतकात सेंट पिटर्सबर्ग या शहराजवळ कॅथरीन पॅलेस या राजवाड्यात अंबर रूम बांधली गेली होती. या खोली अत्यंत मौल्यवान अश्या अंबर नावाच्या स्फटिकाने



बांधली होती आणि पूर्ण खोलीत तब्बल ४५० किलो अंबर वापरला गेला होता. एवढेच नाही तर दारे, खिडक्या आणि छताच्या सजावटीसाठी शुद्ध सोन्याचा वापर केला गेला होता. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात १९४१ मध्ये जर्मनीने यावर कब्जा मिळवला आणि हा सगळा खजिना जर्मनीला नेण्यासाठी सुटा केला. त्यानंतर आजपर्यंत हा खजिना कुठेही दिसला नाही, आणि तो कुठे आहे याचीही कुणालाच माहिती नाही.

### २. सार्कोफॅगस ऑफ मेनोकोर

४५०० वर्षांपूर्वी इजिप्ताच्या गिझा या ठिकाणी पिरॅमिड्स बांधले गेले होते. तिथल्या तीन पिरॅमिड्स पैकी एक पिरॅमिड होता फारोह मेनोकोर या राजाचा. या राजाची ममी बनवून त्यासोबत किमती दागिने आणि इतर वस्तू ठेवून त्यांना पेटीमध्ये बंदिस्त करून पिरॅमिडमध्ये जतन केले होते. १८३० मध्ये ब्रिटिश मिल्ट्रीमन



एडवर्ड याने या पिरॅमिड मध्ये शोधकाम सुरू केले. त्याच्या शोधकार्यात त्याला मेनोकोरची शवपेटी सापडली. त्या पेटीच्या आतमध्ये काय आहे हे बघण्यासाठी आणि ममी तपासण्यासाठी पेटी इंग्लंडला १९३८ मध्ये एका व्यापारी जहाजात पाठवली गेली. असं म्हणतात की, मेनोकोरच्या शापामुळे हे जहाज मध्यसमुद्रात प्रवास करताना बुडाले आणि त्यानंतर अजूनपर्यंत जहाजाचा व मेनोकोरच्या सार्कोफॅगसचा अद्याप पत्ता लागू शकला नाही.

### ३. होन्जो मोसाम्युन स्वोर्ड

जपानची अस्मिता असलेली ही तलवार! या तलवारीचे बाराव्या शतकात निर्माण झाले होते.



तेव्हापासून सहाशे वर्षे ही तलवार जपानच्या राजघराण्याकडे सुरक्षित होती. दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने जपानवर आक्रमण केले तेव्हा अमेरिकन अधिकाऱ्यांची नजर या मूल्यवान तलवारीवर पडली. त्यांनी ती जप्त केली आणि त्यानंतर तलवारीचे काय झाले हे अद्याप कुणालाच समजले नाही. एक तर ती नष्ट केली असावी अथवा अमेरिकेत अज्ञात स्थळी लपवली गेली असावी असा अंदाज आहे.

### ४. क्राऊन ज्वेल्स् ऑफ आयर्लंड

हा दागिना अत्यंत मौल्यवान होता. या दागिन्यामध्ये राणी शारलोटच्या खजिन्यातील खूपच महाग असणारे ३९४ खडे वापरले होते.




सोबतच मुघलांकडून आलेली सोन्याची नाणी आणि टर्कीच्या सुल्तानाकडून आलेले जडजवाहीर सुद्धा याचा हिस्सा होते. हा दागिना डब्लिन कॅसल येथून १९०७ साली चोरीला गेला. हा कुणी चोरला असावा याबद्दल अनेक अंदाज बांधले गेले, अनेक मोठमोठ्या व्यक्तींवर संशय घेतला गेला परंतु शेवटपर्यंत याचा शोध लागू शकला नाही. बहुधा यातले मणी सुटे करून अनेकांना विकले असावेत असेही असू शकते किंवा हा दागिना एकसंधपणे कुणाच्यातरी तिजोरीत बंद असू शकतो. पण तो कुठे आहे हे मात्र अजूनही गूढ आहे.

### ५. डेड बिशप्स ट्रेजर

इसवी सन १३५७ मध्ये सेंट व्हिन्सेंट हा बिशप लिस्बन या देशातून फ्रांसकडे समुद्रमार्गे निघाला होता. त्याच्यासोबत लिस्बन मधून जमा केलेला भलामोठा खजिना होता ज्यात, सोने नाणे, चांदी, जडजवाहीर वगैरे अत्यंत मूल्यवान सामान खच्चून भरले होते. या बिशपचे जहाज स्पेन मधील कार्टजेना या शहराजवळून जात असताना अचानक समुद्री चाच्यांनी (पायरेट्स) जहाजावर हल्ला केला. त्या हल्ल्यात बिशप मारला गेला आणि त्याचा खजिना चाच्यांच्या हाती लागला. त्यानंतर मात्र या खजिन्याची कशी विल्हेवाट लागली याचा कुणालाही काहीही अंदाज नाही.

### ६. द फ्लोरेंटाईन डायमंड

१३३ कॅरटचा हा शानदार हिरा होता. याचा रंग गुलाबी असून हा जगातला सर्वात मोठा गुलाबी 'एकमेवाद्वितीय' असा हिरा होता. नोव्हेंबर १९१८ पर्यंत याची मालकी ऑस्ट्रिया-हंगरी या देशाच्या हब्सबर्ग या राजघराण्याकडे होती. प्रथम विश्वयुद्धात जेव्हा पराभव समोर दिसू लागला तेव्हा त्यांनी हा हिरा स्विझरलँड बँकेच्या तिजोरीत ठेवण्यासाठी



आपल्या एका विश्वासू माणसाच्या स्वाधीन केला होता. मात्र त्यानंतर हा हिरा कुणाच्याही दृष्टीस पडला नाही. हा नेमका कुठे आहे हे कुणालाच माहीत नाही. हा अद्याप अखंड स्वरूपात आहे की याचे तुकडे करून अनेक छोटे हिरे बनवले आहेत याबद्दलही काही सांगता येत नाही.

### ७. इसबेला म्युझिअम स्टोलन आर्ट

१८ मार्च १९९० मध्ये दोन व्यक्तींनी



पोलिसांच्या वेशात 'इसाबेला स्टीवर्ड गार्डनर म्युझिअम' मध्ये प्रवेश केला आणि अत्यंत मूल्यवान आणि जगप्रसिद्ध अश्या १३ वस्तूंची चोरी केली. त्या वस्तूंचे एकत्रित मूल्य पाचशे मिलियन डॉलर्स इतके आहे. हे दोन चोर कोण होते याची अजूनही ओळख पटलेली नाही. या चोरीबद्दल अनेक अंदाज बांधले जातात. चोरीला गेलेल्या वस्तू इतक्या प्रसिद्ध आहेत की त्यांची विक्री करणे कठीण काम आहे. समजा त्या वस्तू विकत घेतल्या तरी घेणारी व्यक्ती तुरुंगात जाऊ शकते. या शक्यतांसोबत अशीही एक शक्यता आहे की या दोन चोरांचा मृत्यू झाला असून त्या वस्तू कुठेतरी धूळ खात पडल्या असाव्यात.

### ८. पेकिंग मॅन

इसवी सन १९२३ मध्ये होमिनाईड मानवाचा सापळा चीनमध्ये उत्खननात सापडला होता. हा सापळा झोकुडीन नावाच्या गावाजवळच्या गुहेत आढळून आला. हे झोकुडीन गाव पेकिंग



जवळ होते म्हणून या सापळ्याला 'पेकिंग मॅन' असे नाव ठेवले गेले. सध्या पेकिंगचे नामकरण बीजिंग असे केले आहे. १९४१ मध्ये जपान आणि चीनच्या युद्धात हा सापळा गायब झाला. सध्या हा कुठे आहे याची माहिती कुणालाच नाही. काहीजणांच्या मतानुसार हा सापळा अमेरिकेला नेताना समुद्रात बुडाला तर काहीजण असे ठामपणे सांगतात की बीजिंगच्या एका इमारतीच्या पार्किंग लॉट खाली हा सापळा दबला गेला आहे.

### ९. नाझी गोल्ड इन लेक टॉलिपझ

दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या काळात हिटलरच्या नाझी फौजेने प्रचंड प्रमाणात सोने लुटले होते. हे सोने आक्रमकांपासून वाचवण्यासाठी



त्यांनी ऑस्ट्रियामधील टॉलीपझ तळ्यात टाकले असे म्हणतात. हे तळे बरेच मोठे असून सोने नेमक्या कोणत्या ठिकाणी आहे याचा अजूनही शोध लागला नाही. सोने शोधण्याचे बरेच प्रयत्न झाले, अनेकांना त्यासाठी जीवही गमवावा लागला पण अजूनही याचा शोध घेतला जातो. तळ्यामध्ये दृश्यमानता अतिशय कमी आहे यामुळे शोधण्यात असंख्य अडचणी येतात. काही जणांच्या मतानुसार ही सोने तळ्यात टाकण्याची फक्त अफवा असून यात अजिबात सत्यता नाही.

### १०. जॉर्ज मॅलोरीज लॉस्ट कॅमेरा

एडमंड हिलरीच्या फार पूर्वी ब्रिटिश गिर्यारोहक जॉर्ज मॅलोरी आणि अँड्र्यू आयर्विन यांनी माउंट एव्हरेस्ट वर चढाई केली होती. त्यांची ही मोहीम सन १९२४ मध्ये आखली गेली होती. दुर्दैवाने या मोहिमेत वादळात सापडून त्यांचा मृत्यू झाला. नोंदीनुसार या चढाईवर जाण्यापूर्वी जॉर्जने



सोबत कॅमेरा सुद्धा नेला होता. जगाच्या दृष्टीने एव्हरेस्ट काबीज करणारा पहिला वीर एडमंड हिलरी असला तरी जॉर्जचा कॅमेरा सापडला तर कदाचित हिलरीचा क्रमांक दुसरा ठरू शकतो. कॅमेरामध्ये एव्हरेस्टच्या शिखरावरून घेतलेले फोटो मिळू शकतात. १९९९ मध्ये जॉर्जचे मृत शरीर सापडले पण त्याचा कॅमेरा सापडला नाही. कदाचित कॅमेरा आयर्विनसोबत असू शकतो पण आयर्विनचा मृतदेह अद्याप सापडला नाही. एव्हरेस्ट काबीज करणारा पहिला वीर कोण याचे गूढ अद्यापही कायम आहे आणि त्या एका कॅमेराच्या माध्यमातून ते समजू शकते म्हणून तो कॅमेरा आता अत्यंत मूल्यवान ठरला आहे.

# ब्रिटिशकालीन कायदे हद्दपार! भारतीय न्याय संहिता १ जुलैपासून लागू

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा) :** देशातील फौजदारी कायद्यात आमूलाग्र बदल करणारे तीन नवीन फौजदारी कायदे १ जुलैपासून लागू झाले आहेत. भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम या कायद्यांची सोमवारी अंमलबजावणी झाली आहे. या नवीन कायद्यांमुळे देशाच्या न्यायिक व्यवस्थेत व्यापक बदल होणार असून ब्रिटिशकालीन कायदे इतिहासजमा होणार आहेत. ब्रिटिशकालीन भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया कायदा, भारतीय पुरावा कायद्याची जागा आता तीन नवे कायदे घेतील. या तिन्ही विधेयकांना २१ डिसेंबर २०२३ रोजी केंद्र सरकारने लोकसभेत मंजुरी दिली होती, तर राज्यसभेत २५ डिसेंबर २०२३ रोजी मंजुरी मिळाली. त्यानंतर राष्ट्रपतींनी मंजुरी दिल्यानंतर या कायद्यांची अंमलबजावणी १ जुलै २०२४ पासून करण्याचे ठरवण्यात आले. या कायद्यात शिक्षा देण्याऐवजी न्याय देण्यावर लक्ष केंद्रित केल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले होते.

**नवीन कायद्यांची वैशिष्ट्ये**

१. फौजदारी खटल्याचा निकाल सुनावणीनंतर ४५ दिवसांत जाहीर करणे बंधनकारक.

२. पहिल्या सुनावणीच्या ६० दिवसांच्या आत आरोपपत्र निश्चित करणे अत्यावश्यक.

३. महिला, लहान मुलांच्या गुन्ह्यांचा तपास दोन महिन्यांत पूर्ण करावा लागणार. ९० दिवसांच्या आत पीडितांना खटल्याच्या प्रगतीचे अपडेट द्यावे लागणार.

४. बलात्कार पीडितेचा जबाब महिला पोलीस अधिकाऱ्याकडून तिच्या पालक किंवा नातेवाईकाच्या उपस्थितीत नोंदवला जाईल. वैद्यकीय अहवाल सात दिवसांत येणे आवश्यक आहे.

५. संघटित गुन्हे आणि दहशतवादी कृत्यांची स्वतंत्र व्याख्या करण्यात आली आहे.

६. मुलांची खरेदी व विक्री गंभीर गुन्हा

७. बालकावर बलात्कार केल्यास आजन्म जन्मठेप व मृत्युदंडाची तरतूद

८. नवीन कायद्यात महिला आणि मुलांवरील गुन्हे, खून आणि राज्याविरुद्धच्या गुन्ह्यांना प्राधान्य देण्यात आले आहे.

९. नवीन कायद्यात भारतीय दंड संहितेतील ५११ कलमांऐवजी ३५८ कायदे असतील.

१०. एखादी व्यक्ती आता पोलीस ठाण्याला प्रत्यक्ष भेट न देता इलेक्ट्रॉनिक मार्गाने तक्रार करू शकते. यामुळे पोलिसांकडून तत्पर कारवाई



करणे सुलभ आणि वेगाने होऊ शकते.

११. 'झिरो एफआयआर' लागू केल्याने, एखादी व्यक्ती अधिकार क्षेत्राचा विचार न करता कोणत्याही पोलीस ठाण्यात तक्रार करू शकते.

१२. पोलीस कारवाईची व्हिडीओग्राफी सक्तीची

१३. साक्षीदारांच्या संरक्षणासाठी साक्षीदार संरक्षण योजना लागू

या तीन कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारने विविध केंद्रीय खाती, राज्य व केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव व पोलीस प्रमुखांसोबत बैठका घेऊन त्याची तयारी केली आहे.

'बार कौन्सिल ऑफ इंडिया'ने आदेश दिले की, नवीन कायद्यांना २०२४-२५ च्या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठात व कायदा शिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रमात समाविष्ट केले जाईल.

लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमीने आयएएस, आयपीएस, न्याय अधिकारी व गुन्हे नोंदणी ब्युरो, फॉरेन्सिक लॅब आदींच्या अधिकाऱ्यांसाठी पाच दिवसांचे प्रशिक्षण आयोजित केले आहे. महिला व बालकल्याण मंत्रालय, ग्रामीण विकास, पंचायतराज मंत्रालयाने २१ जून रोजी नवीन कायद्यासाठी हिंदीत ४० लाख जणांसाठी वेबिनार आयोजित केले, तर २५ जून रोजी इंग्रजीत दुसरे वेबिनार आयोजित केले होते. त्यात ५० लाख जणांनी सहभाग घेतला.

**कलमांचे क्रमांक बदलले**

| गुन्हा | आयपीसी | भारतीय न्याय संहिता |
|---|---|---|
| देशद्रोह | १२४ | १५२ |
| बेकायदेशीर सभा | १४४ | १८९ |
| हत्या | ३०२ | १०१ |
| हत्येचा प्रयत्न | ३०७ | १०९ |
| बलात्कार | ३७६ | ६३ |
| मानहानी | ३९९ | ३५६ |
| फसवणूक | ४२० | ३१६ |

**नवीन कायद्यांमुळे काय बदलणार?**

नवीन कायद्यांमुळे आधुनिक न्याय यंत्रणेत मोठे बदल होणार आहेत. शून्य एफआयआर, पोलिसांकडे ऑनलाईन तक्रारींची नोंद, इलेक्ट्रॉनिक्स मार्गाने समन्स बजावणे, गंभीर गुन्ह्यांच्या तपासासाठी व्हिडीओग्राफी अनिवार्य करण्यात आली आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, नवीन कायदे न्याय देण्यास प्राधान्य देतील, ब्रिटिशकालीन कायद्यांप्रमाणे दंडात्मक कारवाईला प्राधान्य दिले जाईल. हे कायदे भारतीयांनी, भारतीयांसाठी आणि भारतीय संसदेने बनवले आहेत आणि ब्रिटिश फौजदारी न्याय कायद्यांचा अंमल आता संपुष्टात येणार आहे. हे कायदे केवळ नामकरण बदलण्यासाठी नाहीत तर संपूर्ण फेरबदल घडवून आणण्यासाठी आहेत.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4 , Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate , Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com , Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# पाच महिन्यात राज्यात १२९८ बाटल्या रक्त वाया; गतवर्षीच्या तुलनेत लाल पेशी खराब होण्याचे प्रमाण तुलनेने अधिक

■ **मुंबई: संजीनी खाडे**

रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून रक्तपेढ्या सातत्याने संकलन करत असलेले शेकडो लिटर रक्त वाया गेले आहे. रक्त घेतल्यानंतर त्याची मुदत ही फक्त ३५ दिवस असते. मुदत संपल्याने जानेवारी ते मे या पाच महिन्यांत राज्यात १२९८ बाटल्या रक्त वाया गेले आहे. त्यात लाल पेशी वाया जाण्याचे प्रमाण अधिक आहे.

रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे यासाठी रक्तपेढ्या आणि राज्य रक्त संक्रमण परिषदेकडून विविध रक्तदान शिबिरांचे आयोजन केले जाते. या रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रक्त संकलन केले जाते. रक्तपेढ्यांनी संकलित केलेल्या रक्तावर प्रक्रिया करून त्याची साठवणूक केली जाते. संकलित रक्त आणि त्यावर प्रक्रिया करून विलग केलेल्या लाल पेशी यांची जीवन मर्यादा ३५ दिवसांची असते. त्यानंतर हे रक्त व लाल पेशी वापरण्यासाठी अयोग्य ठरतात. त्यामुळे त्यांचा वापर वेळेत होणे आवश्यक आहे. राज्यात यंदा जानेवारी ते मे या पाच महिन्यांत ३५ दिवसांची मुदत संपल्याने १२९८ इतक्या रक्ताच्या बाटल्या वाया गेल्या आहेत. म्हणजे जवळपास २३१ लिटर रक्त वाया गेले आहे. त्यात १३८ बाटल्या रक्त, तर ११६० बाटल्या या रक्तातून वेगळ्या केलेल्या लाल पेशींच्या आहेत. गतवर्षीच्या तुलनेत रक्त वाया जाण्याचे प्रमाण कमी



असले तरी लाल पेशी वाया जाण्याचे प्रमाण हे तुलनेने अधिक आहे. राज्यात २०२३ मध्ये लाल पेशींच्या १६८४ बाटल्या वाया गेल्या होत्या तर या यंदा मेपर्यंत ११६० इतक्या बाटल्या वाया गेल्याचे माहिती अधिकारातून स्पष्ट झाले आहे. राज्य रक्त संक्रमण परिषदेने माहिती अधिकारी कार्यकर्ता चेतन कोठारी यांना ही माहिती दिली आहे. मागील १० वर्षांमध्ये रक्त आणि त्यातील लाल पेशींची ३५ दिवसांची जीवन मर्यादा संपुष्टात येऊन रक्त वाया जाण्याचे प्रमाण कमी करण्यात राज्य रक्त संक्रमण परिषद व रक्तपेढ्यांना यश आले आहे. २०१४ पासून आतापर्यंत रक्त वाया जाण्याचे हे प्रमाण ८० टक्क्यांनी घटले आहे. १० वर्षांमध्ये १० हजार ४९५ लिटर रक्त म्हणजे ४९ हजार ६४ बाटल्या रक्त वाया गेले आहे. अत्यावश्यक स्थितीमध्ये रक्त उपलब्ध व्हावे यासाठी रक्तपेढ्यांना अतिरिक्त रक्त ठेवावे लागते. अनेकदा सारखा रक्तगट उपलब्ध न झाल्यास त्याची मुदत संपल्याने ते वाया जाते. परंतु कोणतीही रक्तपेढी जाणीवपूर्वक रक्त वाया घालवत नाही. काही रक्तपेढ्या त्यांच्या अतिरिक्त साठ्याची माहिती मुदत संपण्याच्या काही दिवस आधी देतात. त्यामुळे राज्य रक्त संक्रमण परिषदेने रक्ताची नासाडी करणाऱ्या रक्तपेढ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे. कालबाह्य झालेले हे रक्त ग्रामीण भागामध्ये पाठवले जाणार नाही यावरही करडी नजर ठेवली पाहिजे.

# आशा व आरोग्य सेविकांच्या आंदोलनामुळे महानगरपालिकेच्या सेवा बाधित

■ **मुंबई: सचिन कदम**

मुंबई महानगर पालिके अंतर्गत कार्यरत असलेल्या आशा व आरोग्य सेविका यांनी ११ जूनपासून बेमुदत आंदोलन पुकारले. मात्र शिक्षक आणि पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकांसाठी लागू करण्यात आलेल्या आचारसंहितेमुळे आशा व आरोग्य सेविकांनी टप्प्याटप्प्याने आंदोलन सुरू ठेवले आहे. मात्र, त्याचा परिणाम महानगरपालिकेच्या आरोग्य सेवांवर होताना दिसत आहे. आशा सेविका व आरोग्य सेविका या मुंबई महानगरपालिकेकडून वस्ती पातळीवर पुरवण्यात येणाऱ्या आरोग्य सेवेचा कणा समजल्या जातात. घरोघरी आरोग्य उपक्रम राबविण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. आशा आणि आरोग्य सेविका



या लहान मुलांचे लसीकरण, ज्येष्ठ नागरिकांची रक्तदाब व मधुमेह यांची तपासणी, गर्भवती महिलांचे लसीकरण यांसह त्यांना औषधे पुरवणे, त्यांच्यासाठी असलेल्या योजना, नवजात अर्भकांची नोंदणी अशी कामे पार पाडत असतात. मात्र मागील महिन्यापासून आशा व आरोग्य सेविकांनी पुकारलेल्या आंदोलनाचा परिणाम महानगरपालिकेच्या या विविध आरोग्य सेवांवर होत आहे. त्याचप्रमाणे क्षयरोगाला प्रतिबंध करण्यासाठी आयसीएमआर आणि राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन प्रकल्पांतर्गत क्षयरोगग्रस्तांचे बीसीजी लसीकरण करण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यानुसार मुंबईत मार्चपासून १८ वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या नागरिकांचे आशा व आरोग्य सेविकांच्या माध्यमातून सर्वेक्षण सुरू केले.

# सात महिन्याच्या बाळाने गिळल्या तीन चाव्या, राजावाडी रुग्णालयाच्या डॉक्टरांनी वाचविले बाळाचे प्राण...

■ **मुंबई: विशाल कारंडे**

घरात खेळत असताना सात महिन्यांच्या बाळाने एकाचवेळी तीन चाव्या गिळल्या. त्या चाव्या श्वास नलिकेत अडकल्याने त्याला श्वास घेण्यास त्रास होऊ त्याची प्रकृती बिघडली. मात्र राजावाडी रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यावर तातडीने शस्त्रक्रिया करून बाळाच्या श्वास नलिकेतून तिन्ही चाव्या बाहेर काढून बाळाचे प्राण वाचवले. दोन आठवड्यांपूर्वी सात महिन्यांचा रेयान घरात खेळत असताना त्याला तेथे चाव्या पडलेल्या दिसल्या. त्या चाव्यांशी खेळताना त्याने त्या पटकन गिळल्या. रेयानने चाव्या गिळल्याचे लक्षात येताच त्याला तातडीने जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथील डॉक्टरांनी रेयानला शताब्दी रुग्णालयात नेण्यास सांगितले. मात्र रेयानच्या कुटुंबियांनी त्याला राजावाडी रुग्णालयात आणले. राजावाडी रुग्णालयात रेयानला दाखल करण्यात आले त्यावेळी चाव्या त्याच्या श्वास नलिकेत अडकलेल्या असल्याने त्याला श्वास घेण्यास त्रास होत असल्याचे कान-नाक-घसा विभागाच्या डॉ. देविका शेरे यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. डॉ. देविका शेरे यांच्याबरोबरच भूल विभागाच्या प्रमुख डॉ. रिना नेबू व डॉ. सुप्रिया येमपल्ले या डॉक्टरांनी रेयानची तपासणी केली असता चाव्या त्याच्या घसा व श्वास नलिकेत अडकल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. चावी व त्याला लावलेली रिंग रेयानाच्या टॉन्सिलजवळ अडकली होती. यामुळे स्वरयंत्राचे व तेथील धमन्यांचे



नुकसान होऊ नये यासाठी सावधगिरीने स्वरयंत्रातून दोन चाव्या आणि रिंग प्रथम काढली. त्यानंतर रेयानच्या पुढील तपासणीदरम्यान अनुनासिक पोकळीत आणखी एक चावी सापडली. नाकाच्या पोकळीत घसरलेली तिसरी चावीही अथक प्रयत्नाने काढण्यात आली. माझ्या १२ वर्षांच्या कारकिर्दीत सात महिन्यांच्या मुलाच्या तोंडच्या पोकळीतून तीन चाव्या काढण्याची ही पहिली आणि दुर्मीळ घटना असल्याचे डॉ. देविका शेरे यांनी सांगितले.

रेयानला शस्त्रक्रियागृहात नेल्यानंतर तो मोठ्याने रडत होता. त्याच्या या रडण्याने त्याच्या घशातील वायूमार्ग बाधित झाला नसल्याचे लक्षात आले. चाव्या आकाराने मोठ्या असल्याने श्वसनलिका बंद झाली नाही. अन्यथा बाळ गुदमरले असते. आम्ही एक जीव वाचवू शकलो याबद्दल आनंद असल्याची भावना राजावाडी रुग्णालयातील भूलविभागाच्या प्रमुख डॉ. रीना नेबू यांनी व्यक्त केली.

# जूनमध्ये मुंबईत साडेअकरा हजारांहून अधिक घरांची विक्री, मागील बारा वर्षातील जूनमधील सर्वाधिक गृहविक्री

■ **मुंबई: यश सावंत**

जूनमध्ये मुंबईत ११ हजार ५६९ घरांची विक्री झाली आहे. या घरविक्रीतून राज्य सरकारला १००१ कोटी रुपयांचा महसूल मुद्रांक शुल्काच्या रूपाने मिळाला आहे. मे महिन्यात १२ हजार घरे विकली गेली होती. त्या तुलनेत जूनमध्ये घरविक्रीत काहीशी घट झाली आहे, असे असले तरी जूनमधील साडे अकरा हजारांची घरविक्री ही मागील बारा वर्षातील जूनमधील सर्वाधिक घरविक्री आहे.

करोनाच्या साथीनंतर हक्काच्या घरांची गरज निर्माण झाली आहे. त्यातून घरविक्रीत वाढ होत आहे. अशात मुंबईत सध्या मोठ्या संख्येने पुनर्विकास प्रकल्प सुरू असून त्या माध्यमातून मोठ्या संख्येने नवीन घरे उपलब्ध होत आहेत. याअनुषंगाने मागील दोन-तीन वर्षात घरविक्री वाढती आहे. २०२४ मध्येही घरविक्रीत चांगली वाढ दिसत आहे. १० ते १४ हजारांच्या आसपास प्रत्येक महिन्यात घरविक्री झाली आहे. जानेवारीत १० हजार ९६७, फेब्रुवारीत १२ हजार ५६, एप्रिलमध्ये ११ हजार ६४८ आणि मे मध्ये १२ हजार घरांची



विक्री झाली होती. तर २०२४ मधील सर्वाधिक घरविक्री ही मार्चमध्ये झाली होती. मार्चमध्ये १४ हजार १४९ घरांची विक्री झाली होती आणि त्यातून सर्वाधिक १ हजार १२३ कोटी रुपयांचा महसूल मिळाला होता.

जूनमध्येही घरविक्री समाधानकारक राहिली आहे. जूनमध्ये मुंबईत ११ हजार ५६९ घरांची विक्री झाली असून त्यातून १००१ कोटी रुपये मुद्रांक शुल्क वसूल करण्यात आला आहे. पावसाळ्यात अर्थात जून-जुलैमध्ये घरविक्रीत घट होते. त्यामुळेच मागील १२ वर्षांचा विचार करता यंदा जूनमधील सर्वाधिक घरविक्री झाली आहे. जून २०१३ आणि जून २०१४ मध्ये ४ हजार ८०० घरांची विक्री झाली होती. तर जून २०१५ ते जून २०२२ पर्यंत घरविक्री ५ हजार ते १० हजारांच्या घरात होती. जून २०२३ मध्ये घरविक्रीने १० हजारांचा टप्पा पार केला; तर या वर्षी घरविक्री ११ हजारांच्या वर गेली आहे. जूनमध्ये पश्चिम आणि मध्य उपनगरातील घरांना अधिक मागणी होती. तर ५००- १००० चौ फुटांच्या घरांची सर्वाधिक विक्री झाली आहे.

# बड्या विकासकांची फौजदारी कारवाईतून सुटका? मोफा कायद्यात दुरुस्तीचा प्रस्ताव

■ **मुंबई: नितीन देवळेकर**

राज्य शासनाने महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट कायद्यात (मोफा) दुरुस्ती करण्याचे ठरविले असून संबंधित दुरुस्ती मंजूर झाल्यास रेराअंतर्गत नोंदणी नसलेल्या विकासकांना हा कायदा लागू होणार आहे. अशा विकासकांसाठीच ही दुरुस्ती असल्याचे विधान शासनाने केले असले तरी यापुढे रेरा अंतर्गत नोंदणी असलेल्या विकासकांना मोफा कायदा लागू होणार नाही. त्यामुळे अशा विकासकांची आपसूकच फौजदारी कारवाईतून सुटका होणार आहे. या बाबतचा प्रस्ताव तयार असून मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर सध्या सुरु असलेल्या पावसाळी अधिवेशनात हे दुरुस्ती विधेयक आणले जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

राज्य शासनाकडून मोफा कायदा रद्द करण्याच्या हालचाली सुरु असल्याचे वृत्त 'लोकसत्ता'ने सर्वप्रथम दिले होते. आता वेगळ्या पद्धतीने मोफा कायद्याचे महत्त्व कमी करण्याचा हा प्रयत्न असल्याचेही सूत्रांनी सांगितले. मोफा कायद्यात फौजदारी कारवाईची तर रेरा कायद्यात फक्त दंडात्मक कारवाईची तरतूद आहे. रेरा कायद्यामुळे मोफा रद्द झाल्याचा युक्तिवाद विकासकांकडून केला जातो. परंतु तशी वस्तुस्थिती नसल्याचे गृहनिर्माण विभागाने उच्च न्यायालयातील एका प्रकरणाच्या निमित्ताने स्पष्ट केले आहे. तरीही विधी व न्याय विभागाकडून मोफा कायद्याच्या अस्तित्वाबाबत महाधिवक्त्यांमार्फत गेल्या आठवड्यात घेण्यात आलेल्या बैठकीनंतर संबंधित दुरुस्ती विधेयक आणण्याचे ठरविण्यात आले. या नुसार मोफा कायद्यातील कलम एक सोबत नवे कलम एक अ समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला. या नव्या कलमामुळे रेरा कायद्याचे संरक्षण नसलेल्या गृहप्रकल्पांना आता मोफा कायद्याचा लाभ मिळेल, असे



भासविण्याचा प्रयत्न याप्रकरणी सादर करण्यात आलेल्या टिप्पणीत करण्यात आला आहे. मात्र मोफा कायदा हा फक्त आता रेरात नोंद नसलेल्या गृहप्रकल्पांनाच लागू राहील, असे या दुरुस्ती विधेयकात स्पष्ट करण्यात आल्याचा दावा सूत्रांनी केला. मोफा कायदा हा पूर्वी सर्वच गृहप्रकल्पांना लागू होता, याकडे या सूत्रांनी लक्ष वेधले. त्यामुळे रेरा कायद्यात असलेले प्रकल्प मोफा कायद्याच्या कचाट्यातून आपसूकच सुटल्याचे दिसून येत आहे.

२०१४ मध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन आणि विकास) कायदा लागू झाल्यामुळे मोफा कायदा रद्द झाल्याचा युक्तिवाद उच्च न्यायालयात सुरु असलेल्या सुनावणीत करण्यात आला होता.

# पावसाळ्यातही रिक्षा-टॅक्सी चालकांकडून भाडे नाकारणे सुरूच

■ **मुंबई: सम्यक कासारे**

मुंबईत रिक्षा आणि टॅक्सी चालकांकडून प्रवासी भाडे नाकारण्याचे प्रकार सुरूच आहेत. यावर ठोस कारवाई न झाल्याने, याचा थेट फटका प्रवाशांना बसत आहे. पावसाळ्यात लोकल सेवा उशिराने धावत असल्याने आणि स्वतःचे




वाहन वापरण्याऐवजी अनेक प्रवासी टॅक्सी किंवा रिक्षाचा पर्याय निवडतात. रिक्षा-टॅक्सी चालक मात्र भाडे नाकारत असल्यामुळे अत्यावश्यक कामासाठी घराबाहेर पडलेल्या प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. मुंबईत मुसळधार पाऊस कोसळू लागताच मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या लोकलचा वेग मंदावतो. त्यामुळे अनेक प्रवासी रस्ते मार्गाने इच्छित स्थळी जाण्याचा पर्याय निवडतात. बेस्टची बस वेळेत उपलब्ध होत नसल्याने प्रवासी रिक्षा किंवा टॅक्सीचा पर्याय निवडतात. मात्र, रिक्षा, टॅक्सी चालक प्रवाशांबरोबर जवळचे भाडे नाकारत असल्यामुळे प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागतो. विशेषतः पावसाळ्यात रिक्षा-टॅक्सी चालक भाडे नाकारत असल्याने प्रवाशांच्या समस्यांमध्ये भर पडते. पूर्वी रिक्षा-टॅक्सी जवळच्या ठिकाणी जाण्यास नकार द्यायचे. मात्र, आता अनेक चालक दूरवर जाण्यासही नकार देवू लागले आहेत. अनेक चालक प्रवाशांना हेरून, त्यांची फसवणूक करून आर्थिक लूट करण्याच्या हेतूने भाडे स्वीकारतात. त्यामुळे अशा चालकांवर कारवाई करणे आवश्यक आहे. प्रवाशांबरोबर गैरवर्तन करणाऱ्या, भाडे नाकारणाऱ्या रिक्षा-टॅक्सी चालकांवर मुंबईतील वाहतूक पोलिसांनी, परिवहन विभागाने कारवाईचा बडगा उगारणे अपेक्षित आहे.

# सर्व अपात्र झोपडीवासीयांसाठी 'नवधारावी'! शासनाकडून सुमारे १२०० एकर भूखंडाची मागणी?

■ **मुंबई: विशाल कारंडे**

आशियातील सर्वात मोठ्या धारावी झोपडपट्टीचा पुनर्विकास करणाऱ्या धारावी पुनर्विकास प्रकल्प कंपनी प्रा. लि.ने सुमारे तीन ते चार लाख अपात्र झोपडीवासीयांसाठी 'नव-धारावी' निर्माण करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी या कंपनीला शासनाकडून धारावी परिसराच्या आसपास सुमारे १२०० एकर भूखंडाची आवश्यकता आहे, असे वरिष्ठ सूत्रांनी सांगितले. मूळ धारावीचा फक्त एक तृतीयांश भूखंड पुनर्वसन व विक्रीसाठी उपलब्ध होणार असून इमारतीच्या उंचींवरही निर्बंध असल्यामुळे धारावीतील सर्व झोपडीवासीयांना अन्यत्र पर्यायी घरे द्यावी लागणार आहेत, असेही या सूत्रांनी स्पष्ट केले.

धारावी पुनर्वसन प्रकल्पासाठी आतापर्यंत मुलुंड, कांजूरमार्ग-वडाळा येथील सुमारे ३०१ एकर भूखंडापाठोपाठ आता कुर्ला दुग्धशाळेचा २१ एकर भूखंड नाममात्र दराने मिळाल्याने आतापर्यंत सुमारे ३२२ एकर भूखंड धारावी पुनर्विकास प्रकल्प कंपनीला वितरीत केला जाणार आहे. ६०० एकर भूखंडावर पसरलेल्या धारावी झोपडपट्टीत सुमारे तीन ते



चार लाख रहिवासी आणि १३ हजार छोट्या व्यावसायिकांचा समावेश आहे. या सर्वांचा पुनर्विकास करण्यासाठी या प्रकल्पाला विशेष दर्जा देत शासनाचा २० टक्के आणि अदानी समुहाचा ८० टक्के वाटा असलेल्या धारावी पुनर्विकास प्रकल्प प्रा. लि. या विशेष हेतु कंपनीची स्थापना करण्यात आली आहे. या कंपनीमार्फत सध्या रहिवाशांचे सर्वेक्षण सुरु असून २००० पर्यंतच्या पात्र रहिवाशांना धारावीतच तर २०११ पर्यंतच्या पात्र रहिवाशांना अडीच लाख रुपये आकारून व त्या व्यतिरिक्त इतर अपात्र रहिवाशांना धारावीबाहेर घरे दिली जाणार आहेत. त्यासाठीच धारावी पुनर्विकास कंपनीला आतापर्यंत ३२२ एकर भूखंडाची तजवीज राज्य शासनाने केली आहे. कांजूरमार्ग-भांडूप-वडाळा येथील २८३ एकर खाजण भूखंड मिळावा यासाठी केंद्र सरकारला प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. ज्या पात्र झोपडीवासीयांसाठी घरे उभारली जाणार आहेत, तो रेल्वेचा एका कोपऱ्यातील भूखंड आहे. त्यामुळे उर्वरित भूखंड हा वांद्रे-कुर्ला संकुलाशी जोडून त्याचे मूल्य वाढणार असल्याचे एका वास्तुरचनाकाराने सांगितले. विकासहक्क हस्तांतरण हक्क म्हणजेच टीडीआरच्या स्वरुपात याआधीच राज्य शासनाने धारावी पुनर्विकास प्रकल्प कंपनीला उपकृत केले आहे. आता मुंबईतील अतिरिक्त भूखंड आंदण दिले जात आहेत. १५ मार्च २०२४ मध्ये महसूल व वन विभागाने शासन निर्णय जारी करून मुंबईतीली सार्वजनिक हिताच्या पायाभूत प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनासाठी शासकीय भूखंड सवलतीच्या दराने देण्याबाबत धोरण निश्चित केले आहे. त्यासाठी रेडी रेकनरच्या २५ टक्के दराने शुल्क आकारून शासकीय, निमशासकीय किंवा ज्यात शासनाचा अंशतः सहभाग आहे अशा म्हाडा किंवा धारावी पुनर्वसन प्रकल्प आदी संस्थांना भूखंड वितरीत करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

# अर्थसंकल्पात 'एसटी'ची झोळी रिकामीच

■ **मुंबई: राकेश गायकवाड**

अर्थसंकल्पात पेट्रोल व डिझेलवरील मूल्यवर्धित कर राज्यभरात समान करण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई, ठाणे व नवी मुंबई या महापालिकांच्या क्षेत्रातील डिझेलवरील सध्याचा कर २४ टक्क्यांवरून २१ टक्के प्रस्तावित केला आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिक, उद्योग व व्यापार क्षेत्राला दिलासा मिळेल. मात्र डिझेलचा सर्वात मोठा ग्राहक असलेल्या एसटीला त्याचा लाभ होणार नाही. एसटीच्या बहुतांश गाड्यांमध्ये ग्रामीण भागात डिझेल भरले जाते. त्यामुळे एसटीला या करातून सूट मिळणार नाही. त्याचप्रमाणे विकास कामांसाठी व नवीन गाड्या घेण्यासाठी अर्थसंकल्पात एका पैशाचीही तरतूद करण्यात आलेली नाही, अशी खंत महाराष्ट्र एस.टी. कर्मचारी कॉंग्रेसने



व्यक्त केली. मुंबई शहरात जादा मूल्यवर्धित कर आकारणी होत असल्याने एसटीने काही वर्षांपूर्वी मुंबईत डिझेल भरणे बंद केले आहे. तर, नवी मुंबईत एसटीचा एकही डिझेल पंप नाही. मुंबई शहरातील मुंबई सेंट्रल व कुर्ला नेहरूनगर येथील दोन्ही डिझेल पंप बंद असून मुंबई – पुणे विना थांबा सेवा सुरू असल्याने फक्त परळ आगारात डिझेल पंप सुरू आहे. नव्या निर्णयामुळे बंद करण्यात आलेले दोन पंप पुन्हा सुरू होतील. राज्यातील डिझेलचा सर्वात मोठा ग्राहक एसटी असून एसटीला डिझेलवरील करातील सूट द्यायला हवी. एसटी 'ना नफा, ना तोटा' व 'प्रवाशांच्या सेवेसाठी' या तत्वावर आधारित असून मुळात एसटीवर कुठलाच कर लादू नये, मात्र विविध कराच्या रूपाने वर्षाला १ हजार २०० इतकी रक्कम एसटीला भरावी लागते, असे कर्मचारी संघटनेने सांगितले.

मागील अर्थसंकल्पात स्थानकांचे नूतनीकरण, एलएनजीमध्ये गाड्या परावर्तित करणे, त्याचप्रमाणे विद्युत वाहनांसाठी चार्जिंग सेंटर उभारणे व इतर बाबींसाठी एसटीकरिता साधारण २ हजार २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. शासनाने त्यापैकी फक्त ३९० कोटी रुपये एसटीला दिले. त्यामुळे एसटी महामंडळाची सातत्याने फसवणूक करण्यात येत आहे, असा आरोप महाराष्ट्र एस.टी. कर्मचारी कॉंग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केला आहे.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
मध्य मुंबई (सा.बां) विभाग, गणपत जाधव मार्ग,
वरळी, मुंबई - ४०० ०१८.

Email :- centralmumbai.ee@mahapwd.gov.in ☎ ४९३६४०४/२४९३१९०२ फॅक्स २४९३१९०२
जा.क्र. का.अ./मर्मुवि/निविदा/ 3554 दिनांक :- 25/6/2024

ई निविदा सूचना क्रमांक ०१ सन २०२४-२५

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २४९३१९०२/२४९३६४०४ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील **मजूर सहकारी संस्था मर्यादित यांचेकडून** ०५ कामाकरीता (१०० लक्ष पेक्षा जास्त) किंमतीच्या कामांची ई-निविदा http://mahatenders.gov.in/http://mahapwd.gov.in मागवित आहेत. सर्व मजूर सहकारी संस्था,मुंबई जिल्हा यांनी प्रचलित नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, वरळी, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी - | दि.२९.०६.२०२४, सकाळी १५.०० पासून ते दि.०५.०७.२०२४ रोजी १५.०० पर्यंत |
| ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) | दि.०६.०७.२०२४ रोजी १५.०० वाजता (कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, यांचे कार्यालय, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई ४०००१८) |

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/५३४


कार्यकारी अभियंता,
मध्य मुंबई (सा.बां) विभाग,
वरळी, मुंबई.

# पेपर फोडणाऱ्यांना शिक्षा; १० वर्षे तुरुंगवास, एक कोटीपर्यंत दंड; पावसाळी अधिवेशनातच कायदा

■ **मुंबई: रघुवीर जाधव**

**मुंबईः स्पर्धा परीक्षांमध्ये होणाऱ्या पेपरफुटी व अन्य गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कायदा करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार या परीक्षांमध्ये पेपरफुटी, कॉपी किंवा अन्य मार्गाने गैरप्रकार करणाऱ्यांना १० वर्षांचा तुरुंगवास आणि एक कोटीपर्यंतच्या दंडाची तरतूद असलेल्या कायद्याचा मसुदा तयार करण्यात आला असून याबाबतचे विधेयक याच अधिवेशनात संमत करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.**

'नीट-यूजी' परीक्षेतील घोटाळ्यानंतर स्पर्धा परीक्षेतील गैरप्रकारला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने काही दिवसांपूर्वीच कायदा केला आहे. राज्यात यापूर्वीच फेब्रुवारी १९९६मध्ये महाराष्ट्र विद्यापीठांच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध अधिनियमात (१९९२) सुधारणा करून हा कायदा राज्य लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्यासाठी लागू करण्यात आला आहे. मात्र १९८२च्या कायद्यात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने करण्यात येणाऱ्या गैरप्रकारांबाबत तपशीलवार तरतुदी नाहीत. तसेच हा कायदा केवळ राज्य परीक्षा मंडळ आणि विद्यापीठांच्या परीक्षेसाठी लागू असल्याने त्यातील शिक्षेच्या तरतुदी कमी आहेत. त्यामुळे स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकाराला प्रतिबंध करण्यासाठी कठोर शिक्षेच्या तरतुदी असलेला नवा कायदा करण्याचा निर्णय गुरुवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.



देशात सध्या केंद्र सरकारप्रमाणे उत्तर प्रदेश, झारखंड, उत्तराखंड, बिहार, राजस्थान या राज्यांनी स्पर्धा परीक्षेतील गैरव्यवहारांवर नियंत्रण आणण्यासाठी कायदा केलेला आहे. राज्यात मध्यंतरी स्पर्धा परीक्षांमध्ये झालेल्या गैरप्रकारानंतर सरकारने राज्य लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष किशोर राजे निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञांची समिती स्थापन केली होती. या समितीने दिलेला अहवाल आणि केंद्र सरकारचा नवा कायदा यांचा विचार करून सरकारने राज्यातील स्पर्धा परीक्षेतील गैरप्रकारांना आळा घालणारा कायदा तयार केला आहे. या कायद्याच्या कक्षेत एमसीएसीप्रमाणेच शिक्षण विभागाच्या शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी आणि शिक्षक पात्रता परीक्षा तसेच सार्वजनिक बांधकाम, ग्रामविकास, सार्वजनिक आरोग्य, जलसंपदा, गृहनिर्माण, महसूल आदी विभागांच्या पदभरतीसाठी होणाऱ्या परीक्षासुद्धा नव्या कायद्याच्या कक्षेत आणण्यात आल्या आहेत.

या कायद्यानुसार उमेदवाराने स्वतः किंवा इतरांच्या साह्याने स्पर्धा परीक्षेत नक्कल करणे, तोतया उमेदवार परीक्षेला बसवणे, पेपरफुटी किंवा उत्तरपत्रिका दुसऱ्याला पुरवणे, कॉपी पुरवणे, परीक्षार्थीला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मदत करणे, गुणवत्ता यादीत फेरफार, परीक्षार्थीचे बनावट प्रवेशपत्र, संगणक नेटवर्क किंवा सिस्टीममध्ये फेरफार करणे, परीक्षेबाबत बनावट संकेतस्थळ तयार करून फसवणूक करणे आदी बाबींचा या कायद्यात समावेश करण्यात आला आहे. तसेच या कायद्यानुसार गुन्हा सिद्ध झाल्यास किमान तीन वर्षे आणि कमाल १० वर्षांची शिक्षेची तरतूद केली जाणार आहे. उमेदवार किंवा पेपर सेटर यांनी परीक्षेत गैरप्रकार केल्यास त्यांना १० लाखापर्यंतच्या दंडासह तीन ते पाच वर्षापर्यंतची शिक्षेची तरतूद करण्यात प्रस्तावित आहे.

सेवा पुरवठादार संस्थेने परीक्षेत गैरप्रकार केल्यास एक कोटीपर्यंतच्या दंडासह त्यांना काळ्या यादीत टाकण्यात येणार आहे. तर अशा संस्थेच्या संचालक वरिष्ठ अधिकाऱ्यांना एक कोटीपर्यंतच्या दंडासह किमान तीन ते कमाल १० वर्षापर्यंत तर परीक्षा आयोजित करणारी संस्था, सेवापुरवठादार यांच्याशी सबंधित व्यक्तींनी एकत्र येऊन परीक्षेत फेरफार केल्यास त्यांना एक कोटीपर्यंतच्या दंडासह पाच ते १० वर्षांचा तुरुंगवास आणि सबंधितांची मालमत्ता जप्त करण्याची तरतूद या कायद्यात करण्यात येणार असल्याचे समजते.


# अकरावी प्रवेश प्रक्रिया : दुसरी प्रवेश यादी १० जुलैला जाहीर होणार

■ **मुंबई: सम्यक कासारे**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ अंतर्गत अकरावी प्रवेशासाठीची नियमित फेरी २ नुसार 'दुसरी प्रवेश यादी' बुधवार, १० जुलै रोजी सकाळी १० वाजता ऑनलाईन पद्धतीने जाहीर होणार आहे. दुसऱ्या प्रवेश यादीअंतर्गत महाविद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांना १० जुलै रोजी सकाळी १० वाजल्यापासून १२ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत प्रवेश निश्चित करता येईल. तसेच, ३ जुलै रोजी सकाळी १० वाजल्यापासून ते ६ जुलै रात्री १० वाजेपर्यंत नवीन विद्यार्थी ऑनलाईन नोंदणी करून वैयक्तिक माहिती असणारा अर्जाचा भाग १ भरून तो प्रमाणित करून घेऊ शकतात आणि महाविद्यालय पसंतीक्रम असणारा अर्जाचा भाग २ भरता येणार आहे. तसेच, या प्रवेश प्रकियेत सुरुवातीपासूनच समाविष्ट असलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय पसंतीक्रम बदलता येतील, अन्यथा मागील फेरीचे पसंतीक्रम कायम राहतील.

पहिल्या प्रवेश यादीअंतर्गत मुंबई महानगरक्षेत्रातील विविध महाविद्यालयांतील २ लाख ४९ हजार ५० जागांसाठी २ लाख २८ हजार ३१२ विद्यार्थी पात्र होते. त्यापैकी १ लाख ३० हजार ६५० विद्यार्थ्यांना महाविद्यालय देण्यात आले आणि ९७ हजार ६६२ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला नाही. पहिल्या प्रवेश यादीनंतरही प्रवेशापासून वंचित राहिलेल्या आणि दुसऱ्या पसंतीक्रमापासून मिळालेले महाविद्यालय पसंत न पडल्यामुळे प्रवेश निश्चित न केलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय पसंतीक्रम बदलता येणार आहेत.

विद्यार्थ्यांना स्वतःच्या लॉगिनमध्ये जाऊन 'चेक अलॉटमेंट स्टेटस' या पर्यायावर क्लिक करून कोणते महाविद्यालय मिळाले, हे पाहता येईल. जर विद्यार्थ्याला मिळालेल्या महाविद्यालयांत प्रवेश घ्यायचा नसल्यास



तो पुढील फेरीसाठी थांबू शकतो. मात्र, विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळाले असल्यास प्रवेश निश्चित करणे बंधनकारक असेल. तसेच, कनिष्ठ महाविद्यालयांना प्रवेशित विद्यार्थ्यांची स्थिती १२ जुलै रोजी रात्री ८ वाजेपर्यंत संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने नोंदवावी लागणार आहे आणि नियमित प्रवेश फेरी ३ साठी रिक्त जागा (केंद्रीय प्रवेश फेरी व कोटांतर्गत रिक्त जागांचा समावेश असेल) जाहीर करायच्या आहेत. दरम्यान, संस्थात्मक, अल्पसंख्यांक आणि व्यवस्थापन या कोटांतर्गतच्या प्रवेशासाठी इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांना लॉगिनद्वारे ३ जुलै रोजी सकाळी १० वाजल्यापासून ६ जुलै रात्री १० वाजेपर्यंत अर्ज भरून ऑनलाईन पसंती नोंदविता येणार आहे. त्यानंतर १० जुलै रोजी संबंधित विद्यार्थ्यांची प्रवेश यादी कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर प्रसिद्ध केली जाईल, तसेच निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कोटांतर्गत प्रवेशासाठी कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरून दूरध्वनीवरून संपर्क साधला जाईल. १० जुलै रोजी सकाळी १० वाजल्यापासून १२ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत कोटांतर्गत प्रवेश निश्चित केले जाणार आहेत.

# सहकारी पक्षांबरोबरच राहून विधानसभेत बहुमत मिळविण्याची भाजपची रणनीती

■ **मुंबई: सचिन कदम**

लोकसभा निवडणुकीत भाजपचा राज्यात मोठा पराभव झाल्याने आणि त्याचे खापर महायुतीतील नेते एकमेकांवर फोडत असताना सहकारी पक्षांबरोबर राहूनच विधानसभा निवडणूक लढवायची आणि बहुमत मिळवायचे, अशी रणनीती भाजपने निश्चित केली आहे. राज्याचा अर्थसंकल्प सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू ठेवून मांडला आहे. त्यामुळे योजना जनतेपर्यंत पोचविण्यासाठी सहकारी पक्षांच्या कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन १० जुलैपर्यंत अभियान राबविण्याचा निर्णय भाजपच्या केंद्रीय नेत्यांच्या उपस्थितीत झालेल्या विस्तारित सुकाणू समितीच्या बैठकीत शनिवारी घेण्यात आला. विधानसभा निवडणुकीत जागावाटपावरून



वाद होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर भाजपच्या केंद्रीय नेत्यांच्या उपस्थितीत प्रदेश भाजपच्या विस्तारित सुकाणू समितीची बैठक प्रदेश कार्यालयात झाली. लोकसभा निवडणुकीत झालेल्या चुका व त्रुटी दूर करून विधानसभा निवडणुकीची तयारी कशी करायची, याविषयी बैठकीत चर्चा झाली. सहकारी पक्षांबरोबर विधानसभा निवडणूक लढवायची आणि बहुमत मिळवायचे, अशी रणनीती भाजपने निश्चित केली असून त्या अनुषंगाने विस्तृत चर्चा झाली. भाजपला सर्वसामान्य जनतेचा आशीर्वाद असल्याने विधानसभेत बहुमत मिळेलच. असे शेलार यांनी बैठकीनंतर पत्रकारांना सांगितले.

भाजपाच्या प्रदेश पदाधिकाऱ्यांची १३ जुलै रोजी तर विस्तारित कार्यसमितीची १४ जुलै रोजी पुण्यात बैठक होणार आहे. या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

# पायाभूत सुविधांचे अनेक प्रकल्प पूर्णत्वाच्या मार्गावर; मेट्रो रेल्वे प्रवाशांमध्ये वाढ

■ **मुंबई: सचिन कदम**

राज्यात पायाभूत सुविधा प्रकल्पांची मोठ्या प्रमाणावर कामे सुरू असून सुमारे ७०१ किमीच्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गापैकी नागपूर ते भरवीर ६०० कि.मी.चा मार्ग रहदारीसाठी खुला करण्यात आला आहे. मुंबई, पुणे, नागपूर, नवीमुंबई येथील मेट्रो प्रकल्पांचे काही टप्पे पूर्ण झाले असून प्रवाशांचा प्रतिसाद वाढत आहे.

मुंबईतील प्रमुख प्रकल्पांपैकी अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा सेतू जानेवारी २४ पासून वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. मुंबई सागरी किनारा रस्ताप्रकल्पाचे काम मार्च २४ अखेर ८७ टक्के पूर्ण झाले असून बिंदूमाधव ठाकरे चौक ते मरीन ड्राइव्हपर्यंतचा मार्ग रहदारीसाठी सुरू करण्यात आला आहे. 'मेट्रो वन'ने रोज प्रवास करणाऱ्यांची सरासरी संख्या ४.६ लाख इतकी असून मेट्रो लाइन २ ए (दहिसर-डीएन नगर) च्या दररोजच्या प्रवाशांची सरासरी संख्या १.१७ लाख इतकी आहे. मेट्रो लाइन ७ (अंधेरी-दहिसर) ने प्रतिदिन ७२३७९ प्रवासी प्रवास करतात. पुणे मेट्रोच्या कॉरिडॉर एक व दोनने प्रतिदिन प्रवास करणाऱ्यांची सरासरी संख्या ४१ हजार असून नागपूर मेट्रोच्या प्रवाशांची संख्या ६९,७६९ इतकी आहे. नवी मुंबईतील सीबीडी ते पेंढार मेट्रो प्रकल्पही नोव्हेंबर २३ पासून सुरू करण्यात आला आहे.

नवी मुंबई विमानतळाचे डिसेंबर २३ अखेर ५७ टक्के काम पूर्ण झाले आहे. राज्यातील विमानतळांवरून



चार कोटी ४६ लाख प्रवाशांनी देशांतर्गत व एक कोटी १४ लाख प्रवाशांनी आंतरराष्ट्रीय प्रवास केला.

राज्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत ३२५३५.७८ किमी रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली असून त्यापैकी २८९९१ किमी रस्त्यांची कामे पूर्णत्वास गेली आहेत. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत विविध दुर्गम वस्त्या-गावे चांगल्या रस्त्याने जोडण्याचे काम करण्यात येते. या योजनेत मार्च २४ अखेर ३०९२२ किमीच्या रस्त्यांची कामे मंजूर करण्यात आली असून त्यापैकी २८५०० किमी रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत. या कामांसाठी १९ हजार ७७८ कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत.

# करोना काळात महापालिकेचे बनावट ओळखपत्र वापरल्याचा आरोप; उच्च न्यायालयाकडून एका महिलेसह दोघांविरोधातील गुन्हा रद्द

■ **मुंबई: यश सावंत**

करोना काळात महापालिकेचे बनावट ओळखपत्र वापरल्याच्या आरोपाप्रकरणी एका महिलेसह दोघांना उच्च न्यायालयाचा दिलासा दिला. या दोघांविरोधातील गुन्हा न्यायालयाने रद्द केला. गुन्हा रद्द करण्याच्या मागणीसाठी चितन संघवी आणि दीपाली गायकवाड या दोघांनी केलेल्या याचिका न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या एकलपीठाने मान्य केल्या. तसेच, त्यांना दिलासा दिला. दोघांवर फसवणूक करण्याच्या उद्देशाने बनावट कागदपत्रे तयार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, रेल्वे किंवा सरकारची फसवणूक करण्याच्या उद्देशाने याचिकाकर्त्यांनी हे कृत्य केल्याचा कोणताही पुरावा नाही. त्यामुळे, त्यांच्यावर ठेवण्यात आलेला आरोप अयोग्य असल्याचे नमूद करून न्यायालयाने उपरोक्त आदेश देताना स्पष्ट केले. करोना काळात केवळ अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांनाच रेल्वेने प्रवास करण्याची मुभा देण्यात आली होती. गायकवाड ही महापालिकेच्या बनावट ओळखपत्राच्या आधारे प्रवास करत




असल्याचे रेल्वे निरीक्षकाच्या लक्षात आले. त्यानंतर तिला ताब्यात घेण्यात आले. त्यावेळी, संघवी यानेही असेच बनावट ओळखपत्र तयार केल्याचे उघडकीस आले. त्यानंतर, दोघांवर फसवणूक करण्याच्या हेतुने बनावट ओळखपत्र तयार केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला. दोघांनी गुन्हा रद्द करण्याच्या मागणीसाठी उच्च न्यायालयात याचिका केली होती.

न्यायालयाने गायकवाड आणि संघवी याची याचिका योग्य ठरवताना महानगरदंडाधिकाऱ्यांनी त्यांना बाजू मांडण्याची संधीच दिली नसल्याचे सादर केलेल्या कागदपत्रांवरून स्पष्ट होत असल्याचे नमूद केले. तसेच, कायद्याच्या संबंधित तरतुदींचे पालन न करता याचिकाकर्त्यांवर आरोपनिश्चित करणे योग्य नसल्याचे न्यायालयाने दोघांना दिलासा देताना स्पष्ट केले. या दोघांना त्यांची बाजू मांडण्याची संधी का दिली नाही याचे स्पष्टीकरणही सरकारी वकील देऊ शकले नाहीत. याशिवाय, या दोघांवर आरोपनिश्चिती करण्यासाठी पुरेसे पुरावे नसल्याचेही स्पष्ट होते, असेही न्यायालयाने याचिकाकर्त्यांविरोधातील गुन्हा रद्द करताना म्हटले.

# प्राधिकरणांना 'झोपु'चे लक्ष्य! दोन लाख झोपड्यांचे पुनर्वसन करण्याचे आदेश

■ **मुंबई: विशाल कारंडे**

मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशातील झोपड्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आता शासनाने महापालिका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी), म्हाडा, सिडको, महाप्रित यांच्यावर झोपु योजनांची जबाबदारी टाकली आहे. येत्या तीन वर्षांत दोन लाख झोपड्यांचे पुनर्वसन पूर्ण करण्याचे



लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्याच्या उद्देशाने झोपड्यांच्या पुनर्वसनासाठी राज्य सरकारने झोपु प्राधिकरणाची स्थापना केली होती. या प्राधिकरणाने लाखो झोपड्यांचे पुनर्वसन केले असले तरी, मुंबई झोपडीमुक्त करणे अद्याप शक्य झालेले नाही. तसेच अनेक झोपु प्रकल्प विविध कारणांनी रखडले आहेत. त्यामुळे आता राज्य सरकारने मुंबईतील सर्वच प्राधिकरणांना या कामी जुंपण्याचे ठरवले आहे. रखडलेल्या आणि नवीन झोपु योजनांबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी मुंबई महानगर प्रदेशातील दोन लाख झोपड्यांचे पुनर्वसन येत्या तीन वर्षांत करण्याचे लक्ष्य झोपु प्राधिकरणासह पालिका, एमएमआरडीए, एमएसआरडीसी, म्हाडा, महाप्रित, सिडको अशा यंत्रणांना दिल्याची माहिती प्राधिकरणातील अधिकाऱ्यांनी दिली. एमएमआरडीएने याआधीच घाटकोपर, माता रमाबाई आंबेडकर नगराचा पुनर्विकास हाती घेतला आहे. मात्र इतर झोपु योजनांचीही जबाबदारी एमएमआरडीएवर टाकण्यात आली आहे का याविषयी विचारले असता त्यांच्याकडून कोणतीही प्रतिक्रिया उपलब्ध होऊ शकली नाही.

झोपु प्राधिकरणाबरोबर भागीदारी तत्त्वावर या झोपड्यांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला आहे. तसेच यंत्रणांना लक्ष्यही देण्यात आले आहे. त्यानुसार मुंबई महापालिकेला तीन वर्षांत ५० हजार झोपड्यांचे पुनर्वसन करावे लागणार असून अन्य यंत्रणांना प्रत्येकी २५ हजार घरांचे पुनर्वसन करावे लागणार आहे.

# विधान परिषदेसाठी भाजप नेत्यांची मोर्चेबांधणी: पंकजा मुंडे, हर्षवर्धन पाटील प्रयत्नशील

■ **मुंबई: संजीनी खाडे**

विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी मिळविण्यासाठी भाजप नेत्यांनी मोर्चेबांधणी सुरु केली आहे. भाजपच्या ज्येष्ठ नेत्या पंकजा मुंडे, रावसाहेब दानवे, हर्षवर्धन पाटील, परिणय फुके आदी १० नेत्यांच्या नावांची शिफारस प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पक्षश्रेष्ठींना केल्याची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. मात्र यासंदर्भात समाज माध्यमांवर सामायिक करण्यात आलेले आपल्या लेटरहेडवरील पत्र बनावट असल्याचे स्पष्टीकरण बावनकुळे यांनी दिले आहे.

विधान परिषदेची निवडणूक पुढील महिन्यात होत असून भाजपचे उमेदवार पाच जागांवर निवडून येतील. या जागांवर उमेदवारी मिळविण्यासाठी अनेक नेते वरिष्ठ नेत्यांच्या भेटीगाठी घेऊन प्रयत्न करत आहेत. पक्षश्रेष्ठींना शिफारस करण्यासाठी भाजपच्या



वरिष्ठ नेत्यांकडून विचारविनिमय सुरू आहे. राज्यातील मराठा-ओबीसी आरक्षण वादाच्या पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील ओबीसी नेत्या पंकजा मुंडे यांच्यासह दानवे, फुके, हर्षवर्धन पाटील आदी नेत्यांच्या नावांवर विचारविनिमय केला जात आहे. पंकजा मुंडे यांना विधानसभा किंवा विधान परिषदेसाठी उमेदवारी न दिल्यास त्यांच्या समर्थकांमध्ये असंतोष निर्माण होऊन पक्षाला मराठवाड्यात फटका बसण्याची शक्यता आहे. परळी मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे धनंजय मुंडे निवडून आल्याने पंकजा यांना विधानसभेसाठी कोणता मतदारसंघ द्यायचा, हा प्रश्न आहे. त्यामुळे त्यांच्या नावाचा विचार विधान परिषदेसाठी होऊ शकतो. लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकीत पराभूत उमेदवारांना राज्यसभा किंवा विधान परिषदेसाठी उमेदवारी द्यायची नाही, हा पक्षाचा सर्वसाधारण निकष आहे.

# गिरगावातील मेहता महल अखेर धोकादायक घोषित

■ **मुंबई: विशाल कारंडे**

गिरगावमधील मेहता महल (आताचा दृष्टी हाऊस) ही तेरा मजली व्यावसायिक इमारत धोकादायक असल्याचा स्पष्ट अहवाल इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने (आयआयटी) दिलेला असतानाही स्थानिक राजकारण्यांच्या दबावामुळे लांबवलेला निर्णय अखेर महापालिकेने घेतला आहे. धोकादायक इमारतींच्या यादीत या इमारतीचा समावेश करण्यात आला आहे.

पालिकेकडून एकीकडे फक्त ३० वर्षे पूर्ण झालेल्या इमारती आवश्यकता नसताना विकासकांच्या फायद्यासाठी धोकादायक घोषित केल्या जात असताना दक्षिण मुंबईतील ऑपेरा हाऊस येथील चर्नी रोड रेल्वे स्थानकासमोर मोक्याच्या ठिकाणी असलेली ही इमारत ५० वर्षांपेक्षा अधिक जुनी असून आयआयटीसारख्या मान्यताप्राप्त संस्थेने ही इमारत धोकादायक असल्याचे अहवालात स्पष्ट करुनही पालिका निर्णय घ्यायला तयार नव्हते. हे प्रकरण न्यायालयातही प्रलंबित होते. मात्र आता पालिकेने धोकादायक इमारतींची जी यादी सादर केली आहेत त्याच या इमारतींचा समावेश आहे.

या व्यावसायिक इमारतीत दररोज तीनशे ते चारशे कर्मचाऱ्यांचा वावर असतो. ही इमारत संरचनात्मकदृष्ट्या धोकादायक असल्याची बाब इमारतीच्या मालकाने वेळोवेळी महापालिकेच्या डी प्रभागाच्या सहायक आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिली. मात्र इमारत धोकादायक असली तात्काळ रिक्त करून पाडून टाकणे आवश्यक नसल्याचा अहवाल महापालिकेच्या तांत्रिक सल्लागार समितीने दिला असल्याचे कारण पुढे केले जात



होते. सध्या या इमारतीची मालकी मे. दृष्टी हॉस्पिटिलिटी कंपनीकडे आहे. इमारतीचे मालक आणि प्रत्यक्ष भाडेकरू (मेहता महल सहकारी गृहनिर्माण संस्था) यांच्यात वाद आहे. या उभयतांनी उच्च न्यायालयात धाव घेतली असून या संदर्भातील वेगवेगळ्या याचिका प्रलंबित आहेत. या सुनावणीदरम्यान व्हिजेटीआय किंवा आयआयटी अशा मान्यताप्राप्त संस्थेकडून इमारतीच्या संरचनेबाबतचा अहवाल सादर करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले. त्यानुसार आयआयटीने संरचनात्मक तपासणी केली. त्यांच्या मते ही इमारत अत्यंत धोकादायक गटात मोडते. ही इमारत तात्काळ रिक्त करून पाडून टाकणे आवश्यक आहे, असा अहवाल दिला. हा अहवाल इमारतीच्या मालकाने पालिकेला सादर केला होता. हा अहवाल पालिकेच्या तांत्रिक सल्लागार समितीपुढे ठेवण्यात आला. मात्र या समितीने तो मान्य केला नव्हता. याबाबत उपलोकायुक्त संजय भाटिया यांच्याकडे या इमारतीतील बेकायदा बांधकामाप्रकरणी सुरु असलेल्या सुनावणीच्या वेळी परिमंडळ एकच्या उपायुक्त श्रीमती संगीता हसनाळे यांनी ही इमारत धोकादायक या श्रेणीत येत असल्याचे मान्य केले होते. मात्र तरीही प्रत्यक्ष कारवाई होत नव्हती. आता धोकादायक इमारतींच्या यादीत पालिकेने या इमारतीचा समावेश केल्यामुळे संबंधितांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

# मुंबई-नाशिक महामार्गावरील कोंडीमुळे नागरिक हैराण, ठाणे ते आसनगाव या दोन तासांच्या अंतरासाठी लागताहेत सात तास

■ ठाणे: तृप्ती गोरे

रस्ते रुंदीकरणासह उड्डाण पुलांची सुरू असलेली कामे, पावसामुळे डांबरी रस्त्यांवर पडलेले खड्डे आणि त्यात शनिवारी सुट्ट्यांमुळे रस्त्यांवर वाढलेला वाहनांचा भार यामुळे वाहतूकीसाठी महत्वाच्या मानल्या जाणाऱ्या मुंबई-नाशिक महामार्गावर कोंडी झाली होती. या कोंडीमुळे माजिवडा ते आसनगाव असे दोन तासांचे अंतर पार करण्यसाठी सात तासांचा अवधी लागत असल्यामुळे नागरिक अक्षरश: मेटाकुटीला आले होते. या मार्गावरील कोंडी टाळण्यासाठी कशेळी-काल्हेर मार्गावरून अनेक चालकांनी प्रवास सुरु केल्याने या मार्गावरही वाहनांचा भार वाढून कोंडी झाल्याचे चित्र दिसून आले. मुंबई-नाशिक महामार्ग हा वाहतूकीच्या दृष्टीकोनातून महत्वाचा मानला जातो. उरण येथील जेएनपीटी बंदरातून येणारी अवजड वाहने मुंब्रा बाह्य वळण मार्गे खारेगाव येथून मुंबई-नाशिक मार्गावरून



वाहतूक करतात. नाशिकहून जेनएनपीटी बंदराकडे जाणारी वाहनेही याच मार्गे वाहतूक करतात. काही वाहने भिवंडी मार्गे वसई येथून गुजरातच्या दिशेने जातात. याशिवाय, भिवंडी शहरात मोठी गोदामे असून याठिकाणी देशातील विविध नामांकित कंपन्यांचे साहित्य ठेवले जाते. येथूनच हे साहित्य शहरांच्या विविध भागात वितरित केले जाते. यामुळे येथे अवजड तसेच हलक्या मालवाहू वाहनांची वाहतूक सतत सुरु असते. दरवर्षी मुंबई-नाशिक महामार्गावर खड्डे पडतात आणि त्यामुळे कोंडी होऊन त्यांचा परिणाम ठाणे, मुंब्रा आणि भिवंडी शहरातील अंतर्गत वाहतूकीवर होताना दिसून येतो. यंदाही हेच चित्र दिसून येत आहे. मुंबई-नाशिक महामार्गावर दोन्ही बाजूला प्रत्येकी दोन पदरी रस्ता आहे. हा रस्ता डांबरी आहे. या रस्त्याशेजारी दोन्ही बाजूला प्रत्येकी चार मार्गिका तयार करण्याची कामे सुरू आहेत. याशिवाय, अनेक ठिकाणी उड्डाण पुल उभारण्यात येत आहे. खाडी पुलावरही पुल उभारणीची कामे सुरू आहेत. हा मार्ग समृद्धी मार्गाला जोडण्यात येणार असून त्यामुळे या रस्त्यांच्या रुंदीकरणाची कामे सुरू आहेत. येथे वाहतूकीसाठी उपलब्ध असलेल्या डांबरी रस्त्यावर गेल्या दोन दिवसांपासून पडणाऱ्या पावसामुळे खड्डे पडले आहेत. त्याचबरोबर रस्ते कामे सुरू असलेल्या ठिकाणी चिखल झाला असून काही ठिकाणी हा चिखल रस्त्यावर आला आहे. यामुळे या मार्गावर कोंडी होत आहे.

# विकासकांना तीन बँक खाती बंधनकारक, हिशोबातील गैरप्रकार टाळण्यासाठी 'महारेरा'चा निर्णय

■ मुंबई: सचिन कदम

घर खरेदीदारांकडून विकासक हे वाहनतळ, मनोरंजन केंद्र, जलतरण तलाव आदी सोयींबाबतची रक्कम वेगवेगळ्या नावाने धनादेशाद्वारे घेतात. त्यामुळे विकासकाने ग्राहकाकडून एकूण किती रक्कम घेतली याचा हिशोब राहत नाही. विकासक याचा गैरफायदा घेत असल्याचे महारेराच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे आता महारेराने प्रकल्पाच्या हिशोबासाठी तीन स्वतंत्र बँक खाती काढणे विकासकांना बंधनकारक केले आहे.

ग्राहकांकडून आलेल्या सर्व पैशांसाठी विकासकांनी 'महारेरा पदनिर्देशित संकलन खाते', प्रकल्पाची जमीन आणि बांधकामांसाठी ७० टक्के रकमेचे 'महारेरा पदनिर्देशित विभक्त खाते' आणि विकासकाच्या ३० टक्के रकमेसाठी 'महारेरा पदनिर्देशित व्यवहार खाते' अशी तीन स्वतंत्र बँक खाती




१ जुलैपासून बंधनकारक केली आहेत. यासंबंधीचा अंतिम निर्णय जारी करण्यात आला आहे. स्थावर संपदा अधिनियमानुसार ग्राहकांकडून आलेल्या रकमेपैकी, त्या प्रकल्पाचो बांधकाम आणि भूखंडासाठी लागणारी ७० टक्के रक्कम स्वतंत्र खात्यात ठेवणे आवश्यक आहे. असे असताना विकासक सदनिकेची नोंदणी करताना सदनिकेशिवाय वाहनतळ, जलतरण तलाव, मनोरंजन केंद्र किंवा इतर सोयीसुविधांसाठी किंवा तत्सम वेगवेगळ्या कारणांसाठी गृहनिर्माण प्रकल्पाचे प्रवर्तक सांगतील त्या वेगवेगळ्या नावाने ग्राहकांकडून धनादेश घेतात. परिणामी घर खरेदीदाराने सदनिका नोंदणी आणि तत्सम बाबींसाठी प्रवर्तकाला एकूण किती पैसे दिले, हे एकत्रितपणे कुठेच दिसत नाही. याचा गैरफायदा घेत विकासक आर्थिक गैरव्यवहार करत असल्याचे महारेराच्या निदर्शनास आले आहे. महारेराने एकाच बँकेत प्रकल्पाची तीन पदनिर्देशित खाती काढण्याबाबतचे निर्देश मार्चमध्ये जारी केले. त्याच वेळी ज्या खात्यात घर खरेदीदाराने पैसे जमा करायचे त्या खात्याचा क्रमांक विक्री करारात आणि सदनिका नोंदणीपत्रात नमूद करणेही बंधनकारक करण्याचा निर्णय मार्चमध्ये घेतला. तर आता मार्चमध्ये घेतलेल्या निर्णयासंबंधी सादर झालेल्या सूचना-हरकती विचारात घेत या निर्णयाला अंतिम स्वरूप दिले आहे.

# म्हाडाच्या विक्रोळीतील नव्या कोऱ्या घरांमध्ये गळती, बांधकामावर प्रश्नचिन्ह

■ मुंबई: सम्यक कासारे

विक्रोळीमधील म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या नव्या कोऱ्या घरांमध्ये गळती सुरू झाली आहे. पहिल्याच पावसात विक्रोळीतील म्हाडा वसाहतीमधील अनेक घरांमध्ये गळती होऊन भिंती खराब होऊ लागल्या आहेत. त्यामुळे विक्रोळीतील विजेत्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असून म्हाडाच्या बांधकामावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. मुंबई मंडळाने ऑगस्ट २०२३ मध्ये ४०८२ घरांसाठी सोडत काढली होती. नवीन पध्दतीनुसार ही सोडत काढण्यात आली होती. त्यामुळे पहिल्यांदाच सोडतीनंतर अवघ्या दोन-अडीच महिन्यात विजेत्यांना घराचा ताबा देण्यास सुरुवात झाली. बहुसंख्य विजेत्यांना घराचा ताबा देण्यात आला आहे. हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण झाल्याने विजेते आनंदी आहेत. पण २०२३ च्या सोडतीतील विक्रोळीतील विजेत्यांच्या आनंदावर आता



विरजण पडले आहे. काही दिवसांपूर्वीच ताबा घेतलेल्या विक्रोळीतील नव्या कोऱ्या घरात गळती सुरू झाली आहे. संकेत क्रमांक ४१५ योजनेत अत्यल्प गटातील २५८ घरांचा समावेश होता. या घरांसाठी ३६ लाख १६ हजार रुपये अशी किंमत निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार ३६ लाख भरून ताबा घेतलेल्या घरात आता मोठ्या प्रमाणावर गळती होत असल्याने विजेते हैराण झाले आहेत. नवीन घरांची दुरवस्था होण्यास सुरूवात झाल्याने विजेत्यांनी आता म्हाडाच्या, कंत्राटदार शिर्के कंपनीच्या कामावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप करीत घरांची तात्काळ दुरुस्ती करून देण्याची मागणी विजेत्यांनी केली आहे. या प्रकरणाची चौकशी करून दोषीविरोधात कडक कारवाई करावी, अशी मागणी विजेत्यांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, घरांमध्ये गळती सुरू आहेच, पण त्याचवेळी पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि अन्य समस्यांमुळे रहिवासी हवालदिल झाले आहेत, अशी माहिती एका विजेत्याने दिली.

# खाद्यपदार्थांच्या गाड्यांवर कारवाईचा बडगा; अतिक्रमण निर्मूलन पथकांची कारवाई

■ मुंबई: माधव अलवा

मुंबई महानगरपालिकेने गेल्या आठवड्यापासून मुंबईतील खाद्यपदार्थांच्या गाड्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यास सुरुवात केली आहे. या कारवाईअंतर्गत गेल्या आठवड्याभरात फेरीवाल्यांच्या गाड्या व अन्य सामान जप्त करण्यात आले आहे. त्यात ७१३ चारचाकी हातगाड्या, १ हजार ०३७ स्वयंपाकाचे गॅस सिलिंडर आणि १ हजार २४६ इतर विविध प्रकारच्या साहित्याचा समावेश आहे. 'फेरीवालामुक्त परिसर' मोहिमेअंतर्गत १८ ते २४ जून २०२४ दरम्यान विविध विभागांत अतिक्रमण निर्मूलन कारवाई करण्यात आली.



मुंबईकर नागरिकांना पदपथ आणि रस्त्यांचा वापर करताना अडथळा ठरणाऱ्या, तसेच आरोग्यासाठी अपायकारक अशा पद्धतीने उघड्यावर अन्न पदार्थांची विक्री करणाऱ्या फेरीवाल्यांविरोधात मुंबई महानगरपालिकेमार्फत सातत्याने कारवाई करण्यात येते. मुंबई महानगरातील अनधिकृत फेरीवाल्यांविरोधातील कारवाईविषयी समन्वय ठेवण्याच्या दृष्टीने महानगरपालिका प्रशासन आणि मुंबई पोलीस यांची संयुक्त बैठक महानगरपालिका मुख्यालयातील महानगरपालिका आयुक्तांच्या दालनात गुरुवारी सायंकाळी पार पडली. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मुंबईतील अनधिकृत फेरीवाले, बेवारस वाहने, पदपथावरील अतिक्रमणे आदींवर कठोर कारवाई करावी; मुंबई अनधिकृत फेरीवालेमुक्त करावी, पादचाऱ्यांसाठी पदपथ मोकळे करावेत, असे निर्देश भूषण गगराणी यांनी दिले. त्यानुसार, अतिक्रमण निर्मूलन कारवाईला अधिक वेग देण्यात येत आहे.

मुंबईतील विविध विभागांमध्ये गेल्या आठवडाभरात झालेल्या कारवाईत चारचाकी हातगाड्या, स्वयंपाकाचे गॅस सिलिंडर, स्टोव्ह, शेगडी, बाकडे, शॉरमा यंत्र आदी जप्त करण्यात आले.

# वर्सोवामधील अनधिकृत बांधकामाविरोधात कारवाई; अधिकाऱ्यांच्या बदलीनंतर थंडावली

■ मुंबई: संजीनी खाडे

पश्चिम उपनगरातील अंधेरीमधील वर्सोवा परिसरात सुरू करण्यात आलेली अनधिकृत बांधकामाविरोधातील कारवाई गेल्या १५ दिवसांपासून थंडावली आहे. महानगरपालिकेने मोठा गाजावाजा करून सुरू केलेल्या कारवाईनंतर मध्येच सहाय्यक आयुक्तांची तडकाफडकी बदली करण्यात आली. मात्र बदलीनंतर १५ दिवस झाले तरी अद्याप नवीन सहाय्यक आयुक्तांनी पदभार स्वीकारला नाही. तसेच गेल्या १४ दिवसांपासून कारवाई थंडावली आहे. त्यामुळे महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी एका अभियंत्याला निलंबित केले. त्यानंतर आयुक्तांच्या आदेशानुसार वर्सोवामधील अनधिकृत बांधकामांवर कारवाईसाठी एक विशेष पथकही नेमण्यात आले.

या पथकाने कारवाई करून तीन अनधिकृत इमारती पाडल्या. ही कारवाई सलग काही दिवस सुरू होती. त्यातच मध्येच महानगरपालिका प्रशासनाने अंधेरी, जोगेश्वरी पश्चिमेचा भाग असलेल्या के पश्चिम विभाग कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त डॉ. पृथ्वीराज चौहाण यांची



१४ जून रोजी तडकाफडकी बदली केली. त्यांना वडाळा, शीवचा भाग असलेल्या एफ उत्तर विभागात पाठवण्यात आले. राजकीय हेतूने त्यांची बदली करण्यात आल्याची चर्चा महानगरपालिका वर्तुळात सुरू आहे. चौहाण यांच्या बदलीला आता १५ दिवस झाले असून तेव्हापासून वर्सोवा परिसरातील कारवाई पूर्णतः थंडावली आहे. त्यामुळे या कारवाईमागे आणि बदलीमागे राजकीय दबाव असल्याची चर्चा आहे. दरम्यान, पृथ्वीराज चौहाण यांच्या जागी एफ उत्तर विभाग कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त चक्रपाणी अल्ले यांची नेमणूक करण्यात आली आहे. परंतु, त्यांनी अद्याप या विभागाची सूत्रे स्वीकारलेली नाहीत. त्यामुळे यावरूनही उलटसुलट चर्चा सुरू आहे.

अंधेरी पश्चिमेला असलेल्या वर्सोवा परिसरातील अनधिकृत बांधकामांचा मुद्दा महानगरपालिका प्रशासनात सध्या चांगलाच गाजत आहे. अनधिकृत बांधकामे, मोठ्या प्रमाणात अनधिकृत फेरफार, मोकळ्या जमिनीवरील बांधकामे, विशेषतः वेसावे येथे सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन परिसरात व दलदलीच्या जमिनीवर अनाधिकृत बांधकामांविषयी प्रशासनाकडे मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होत होत्या. या बांधकामांवर कारवाई करण्याकरीता वारंवार सांगूनही त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे जूनच्या पहिल्या आठवड्यात महानगरपालिका प्रशासन राजकीय दबावाखाली काम करीत असल्याची चर्चा पालिका वर्तुळात सुरू आहे.

# झोपड्यांवरील कारवाईविरोधात पवईतील जयभीम नगरचे रहिवाशी उच्च न्यायालयात; तोडलेल्या झोपड्या पुन्हा बांधून देण्याची मागणी

■ मुंबई: सचिन कदम

पवईतील जयभीम नगर येथील झोपड्यांवर महानगरपालिकेने पाडकाम कारवाई केली होती. या कारवाईविरोधात जयभीम नगर येथील रहिवाशांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. तसेच, तोडलेल्या झोपड्या महानगरपालिका व पोलिसांना पुन्हा बांधून देण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी केली आहे. रहिवाशांनी या फौजदारी याचिकेद्वारे नुकसानभरपाईचीही मागणी केली आहे.

झोपड्यांवरील कारवाईची चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायाधीशांच्या नेतृत्त्वाखाली विशेष तपास पथकाची (एसआयटी) नियुक्ती करावी, एसआयटी विहित वेळेत प्रकरणाची चौकशी करून त्याबाबतचा अहवाल न्यायालयात सादर करावा. याशिवाय, झोपड्यांवर हातोडा चालवणाऱ्या पोलीस व महानगरपालिका अधिकाऱ्यांची खातेनिहाय चौकशी करून त्याचाही अहवाल न्यायालयात सादर करण्याचे आदेश देण्याची मागणी याचिकाकर्त्यांनी केली आहे. कारवाई करणाऱ्या पोलीस व महानगरपालिका अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी पोलीस आयुक्तांकडे आपण तक्रार केली होती. परंतु, त्यावर काहीच प्रतिसाद देण्यात आला नाही. त्यामुळे, न्यायालयानेच या अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा नोंदवण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी देखील याचिकाकर्त्या रहिवाशांनी केली आहे. मीना लिंबोले यांच्यासह २८ रहिवाशांनी ही याचिका केली आहे. न्यायमूर्ती रेवती डेरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठासमोर ही याचिका नुकतीच सादर करण्यात आली. त्याची दखल घेऊन न्यायालयाने याचिका ९ जुलै रोजी सुनावणीसाठी ठेवली, दरम्यान, कारवाईच्या वेळी रहिवाशांना जोरदार विरोध केला. पोलिसांना पाचारण करण्यात आले. त्यानंतर रहिवाशांच्या



विरोधाला हिंसक वळण लागल्यानंतर पोलिसांनी कारवाईला विरोध करणाऱ्या रहिवाशांवर लाठीमार केला. गेल्या ३० वर्षांहून अधिक काळापासून या परिसरात आमच्या झोपड्या आहेत. आधार ओळखपत्र, मतदान ओळखपत्र, निवासी (डोमासाईल) दाखला, वीज देयके यासह सर्व अधिकृत कागदपत्रे आपल्याकडे आहेत. सुमारे ८०० झोपड्या असलेला हा भूखंड हिरानंदानी समुहाच्या मालकीचा आहे. कंपनीकडून आपल्याला पर्यायी जागा देण्याचा प्रस्ताव देण्यात आला होता. त्यावेळी, अनेक वर्षे आम्ही येथे राहत आहोत. मुलांच्या शाळाही याच परिसरात आहेत. त्यामुळे, आम्हाला याच परिसरात घरे द्यावीत, अशी विनंती हिरानंदानी यांच्याकडे करण्यात आली. त्यानंतर, १ मे २०२४ रोजी झोपड्या रिकाम्या करण्याची नोटीस सार्वजनिक शौचायल व पाण्याच्या टाकीवर लावण्यात आली.

# गरज शिक्षणव्यवस्थेच्या पुनरुत्थानाची

■ मुंबई: विशाल कारंडे

भारताच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण करून देणाऱ्या नालंदा विद्यापीठाच्या भव्य इमारतीचे आणि प्रशस्त आवाराचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नुकतेच झाले. वास्तविक पाहता येथे अध्यापनाचे कार्य त्या आधीपासूनच सुरू झाले होते. या उद्घाटन समारंभामध्ये विद्यापीठाच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, नालंदा हे केवळ एक सामान्य विद्यापीठाचे नाव नाही तर ही भारताची वेगळी ओळख आहे.

जगभरात भारताला मिळणाऱ्या सन्मानाचे प्रतीक आहे. ज्ञानसाधनेचे केंद्र म्हणून जगभरात भारताची ओळख करून देणारे हे विद्यापीठ आहे. अगदी प्राचीन काळापासून आजपर्यंत संपूर्ण जगभर या विद्यापीठाचे नाव आदराने घेतले जात आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० आणि अन्य योजनांच्या माध्यमातून देशाला ज्ञान-विज्ञान आणि संशोधन क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर अग्रेसर करण्याचा प्रयत्न सुरू असताना, नालंदा विद्यापीठाचा जीर्णोद्धार एक महत्त्वपूर्ण घटना आहे. ही घटना भारतीय संस्कृती आणि तिच्या मानबिंदूचे पुनरुज्जीवन करणारी अशीच आहे.

नालंदा विद्यापीठाची स्थापना इसवी सन पूर्व ४२७ मध्ये झाली. त्या काळात हे विद्यापीठ जगातील सर्वात मोठे विद्यापीठ होते. त्या काळात तेथे दहा हजारांहून अधिक विद्यार्थी शिकत होते. 'विश्वगुरू' या उपाधीला नालंदा विद्यापीठानेच जन्म दिला होता, तेच पूर्ववैभव पुन्हा मिळवण्यासाठी आज भारत प्रयत्नरत आहे.

नालंदा विद्यापीठाची करण्यात आलेली जाळपोळ ही केवळ विद्यापीठापुरती मर्यादित न राहता भारताला जोडणाऱ्या आणि एकसंघ ठेवणाऱ्या ज्ञानशक्तीचा विध्वंस ठरली. मात्र, पुस्तके जाळून ज्ञान नष्ट होऊ शकत नाही; ते लोकांच्या स्मरणात राहते आणि योग्य वेळ आल्यावर पुनरुज्जीवित होते, याची साक्ष म्हणजे हे विद्यापीठ आहे.

यासाठी अट एकच आहे, ती म्हणजे हे ज्ञानसंवर्धन करणारा समाज हा संघर्षरत राहून ज्ञानोपासना करणारा आणि विजिगिषु वृत्तीचा असला पाहिजे. ज्ञानाचे अनेक प्रकार आहेत पण ते ओळखून त्याचे संवर्धन करणे हे केवळ अभ्यासानेच शक्य आहे आणि यासाठी विद्यापीठे अथवा शैक्षणिक संस्थांची नितांत आवश्यकता आहे. नालंदा विद्यापीठाच्या बाबतीतही बोलायचे झाल्यास ते काही एका दिवसात जगातील सर्वात मोठे विद्यापीठ ठरले नव्हते. कोणत्याही विद्यापीठाची



निर्मिती ही प्रदीर्घ प्रक्रिया आहे. आज जेव्हा आपण नालंदा विद्यापीठाबाबत चर्चा करत आहोत तेव्हा एक गोष्ट आपल्याला कायम स्मरणात ठेवणे आवश्यक आहे.

ती बाब म्हणजे, नालंदा विद्यापीठाचे वैभव हे त्या विद्यापीठाच्या वास्तूंमध्ये नव्हे तर त्या विद्यापीठातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी या विद्यापीठाला जगातील सर्वात श्रेष्ठ स्थान मिळवून दिले होते, ते आहे. विशेष म्हणजे या विद्यापीठाबाबत जे काही उल्लेख उपलब्ध आहेत; त्यानुसार या विद्यापीठाच्या कामकाजामध्ये तत्कालिन प्रशासक अजिबात हस्तक्षेप करत नसत.

दूरदूरच्या देशातून येणारे विद्यार्थी येथे अध्यापन करत आणि भारताची त्यांच्या मनात निर्माण झालेली उन्नत प्रतिमा व आपलेपणा कायम ठेवत मायदेशी निघून जात. मात्र विरोधाभास असा आहे की, 'नालंदा'सारखे विद्यापीठ देशाने जगाला दिले; आज त्याच देशातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी परदेशात जावे लागत आहे.

याचे प्रमुख कारण म्हणजे देशात उच्च गुणवत्ता असलेल्या आणि विद्यार्थ्यांना सर्वोत्कृष्ट शिक्षण देऊ शकणाऱ्या चांगल्या संस्थांची संख्या कमी आहे. यामुळे भारतातील गुणवत्ता बाहेर जात आहे हे तर उघड आहेच; पण त्याही पलीकडे आर्थिक पातळीवर पाहायचे झाल्यास सुमारे पाच हजार कोटी रुपये शैक्षणिक खर्चापोटी परदेशात जात आहेत. उच्च शिक्षणासाठी परदेशात जाणाऱ्या आपल्या देशातील विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यामुळे केवळ वास्तूंच्या निर्मितीवर भर न देता, उच्च दर्जा असलेल्या आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या अधिकाधिक संस्थांची निर्मिती व्हायला हवी. ज्यायोगे भारतीय विद्यार्थी भारतातच शिक्षण घेतील. देशातील सध्याच्या शैक्षणिक वातावरणाबद्दल बोलायचे झाल्यास, सध्या सर्वाधिक चर्चेचा विषय म्हणजे परीक्षांमध्ये होणारे गैरप्रकार. हे रोखण्यासाठी सरकारने नुकताच एक कायदा देखील केला आहे. कोरोना काळानंतर संपूर्ण देशभरातच ऑनलाइन शिक्षण आणि ऑनलाइन परीक्षा यावर भर देण्यात आला. परिणामी शिक्षण संस्थांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर अधिक जोर देण्यात आला.

ऑनलाइन तंत्रज्ञानामुळे परीक्षा प्रक्रिया सोपी झाली आणि शिक्षण संस्थांवरील ताण देखील काही अंशी हलका झाला. त्यामुळे यावर भर देण्यात आला असला तरी प्रत्यक्षात त्याचा कितपत उपयोग होतो अथवा विद्यार्थ्यांसाठी ते किती उपयुक्त ठरत आहे, याकडे लक्ष देणेही आवश्यक आहे. आणखी एक म्हणजे आपल्या देशात पदव्या घेण्यात लोकांना उत्साह असला तरी प्रत्यक्ष शिक्षण प्रक्रियेमध्ये सहभागी होऊन एखाद्या गोष्टीचे शिक्षण घेण्यात फारसा रस आणि प्रामाणिकपणा न दाखवता त्यातून पळवाटा शोधण्याची वृत्ती निर्माण होत आहे. याला काही प्रमाणात शिक्षकदेखील कारणीभूत आहेत. कारण त्यांनी संपूर्ण शिक्षणालाच परीक्षाकेंद्री बनवले आहे.

# ‘खाकी’चा धाक दाखवून मुंबईतील हॉटेल मालकाला २५ लाखांना लुटलं, मुख्य आरोपींना दिल्लीतून अटक; दोन पोलिसांसह एकूण ११ आरोपी अटकेत

**मुंबई: विशेष प्रतिनिधी**

मुंबईच्या सायन पोलीस स्टेशनच्या हद्दीत कॅफे म्हैसूरच्या मालकाला 'खाकी'चा धाक दाखवून लुटले होते. या प्रकरणात सायन पोलिसांकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. दोन पोलिसांसह ९ आरोपींना सायन पोलिसांकडून अटक करण्यात आली होती. मात्र, दोन मुख्य आरोपी फरार होते, त्यांना देखील सायन पोलिसांनी दिल्लीतून अटक केली आहे. लोकसभा निवडणुकीत पोलिसांच्या गुन्हे शाखेचे अधिकारी असल्याचं सांगत एका हॉटेल व्यावसायिकाच्या घरात घूसून २५ लाखांची रोकड लुटल्याची घटना मुंबईच्या सायन येथे घडली होती.

**मुंबईतील कॅफे मालकाला 'खाकी'चा धाक दाखवून लुटलं**

मुंबईत दिवसाढवळ्या घडलेल्या या प्रकारानं सर्वत्र खळबळ माजली होती. आरोपी मुंबई गुन्हे शाखेचे अधिकारी असल्याचं सांगत त्यांनी आपली ओळखपत्र हॉटेल मालक नरेश यांना दाखवली. तुमच्या फ्लॅटमध्ये १७ कोटी रुपयांचा काळा पैसा ठेवला असून तो लोकसभा निवडणुकीसाठी वापरण्यात येणार आहे, अशी आम्हाला माहिती मिळाल्याचं संबंधित व्यक्तींनी नरेश यांना सांगितलं. नरेश यांनी आपल्याकडे एवढी मोठी



रक्कम असल्याचं नाकारलं.

**हॉटेल मालकाचे २५ लाख रुपये लंपास**

त्यानंतर या आरोपींनी हॉटेल मालकाच्या घरी सर्च करून २५ लाख रुपये रोकड घेऊन फरार झाले होते. हॉटेल मालकाचा तक्रारी नंतर सायन पोलिसांनी गुन्हा दाखल करून दोन पोलीस कर्मचाऱ्यासह नऊ लोकांना अटक केली होती. मात्र या गुन्ह्यात मास्टरमाइंड मुख्य आरोपी प्रेमचंद जैस्वाल वय ५४ वर्ष आणि त्याच्या साथीदार पडून गेले होते. सायन पोलिसांनी तांत्रिक तपास करून तब्बल दीड महिना नंतर दोन्ही आरोपींना दिल्ली मधून अटक केली आहे.

**दोन आरोपींना दिल्लीमधून अटक**

अटक मुख्य आरोपीचे नाव प्रेम चंद जैस्वाल वय ५४ वर्ष आणि त्याचा साथीदार आरोपी कृष्णा नाईक वय ३४ वर्ष आहे. प्रेमचंद जैस्वाल हा मास्टरमाइंड आरोपी असून त्याच्यावर मुंबई शहरात अशाच पद्धतीने रॉबरी करण्याचे पाच गुन्हे दाखल आहेत. सध्या सायन पोलिसांनी दिल्लीमधून या दोन्ही आरोपीला अटक करून मुंबईला घेऊन येऊन या आरोपीचा आणखी कोण साथीदार आहे का? मुंबई शहरात या आरोपीने किती चोऱ्या केल्या आहेत, या संदर्भात अधिक तपास सुरु आहेत.

# अल्पवयीन आदिवासी विवाहितेचा गरोदरपणात मृत्यू; पतीला अटक, दहा जणांविरुद्ध गुन्हा

**पालघर: विशेष प्रतिनिधी**

केंद्र आणि राज्य सरकारनं बालविवाह रोखण्यासाठी अनेक कायदे आणि उपाययोजना केल्या असल्या तरी, ग्रामीण भागात तसेच आजही आदिवासी भागात अल्पवयीन मुला-मुलींचे विवाह होण्याचं प्रमाण वाढत आहे. मोखाडा तालुक्यात अल्पवयीन आदिवासी विवाहितेचा गरोदरपणात मृत्यू झाल्यानं पुन्हा एकदा अल्पवयीन आदिवासी मुला-मुलींचे विवाह चर्चेत आले आहेत. या गंभीर प्रश्नाकडं शासन आणि प्रशासकीय यंत्रणेचं दुर्लक्ष होत असल्यामुळं असे विवाह होण्याचं प्रमाण वाढलं आहे.

अल्पवयातील विवाहानं गरोदरपणात गुंतागुंत : पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यात अशाच प्रकारे झालेल्या एका अल्पवयीन मुला-मुलीच्या विवाहातून मुलगी गरोदर राहिली आणि गरोदरपणातच या अल्पवयीन मुलीचा मृत्यू झाला. पोलिसांनी आता अल्पवयीन मुलीच्या पतीला अटक केली आहे. बालविवाह प्रतिबंधक कायद्याचं उल्लंघन केल्यामुळं पोलिसांनी मुलीचे आई-वडील, सासू-सासरे, लग्न लावणारे भटजी, मंडप डेकोरेटर अशा आणखी दहा जणांवर गुन्हा दाखल केला आहे. वास्तविक अशा अल्पवयीन मुला-मुलींच्या विवाह समारंभाला उपस्थित राहणाऱ्या सर्वच व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्याची कायद्यात तरतूद आहे. अल्पवयातील प्रेमसंबंधातून मुलगी गरोदर : मोखाडा तालुक्यातील एका गावात राहणाऱ्या तरुणीचे जव्हार तालुक्यातील एका तरुणाशी सुमारे दोन वर्षांपासून प्रेमसंबंध होते. यादरम्यान मुलगी गरोदर राहिली. तिच्या कुटुंबीयांनी गेल्या २९ मार्चला तिचे लग्न संबंधित तरुणासोबत




लावले. लग्नाअगोदरच गरोदर असलेल्या या अल्पवयीन मुलीला सहा जून रोजी मोखाडा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु गर्भधारणेशी संबंधित गुंतागुंतीमुळं तिचा मृत्यू झाला. त्यावेळी ती साधारण सहा महिन्याची गरोदर होती. याचा अर्थ चौदाव्या-पंधराव्या वर्षीच तिचे तरुणासोबत शारीरिक संबंध आले होते. सुरुवातीला तिच्या मृत्यूची अकस्मात मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली. परंतु पोलिसांच्या तपासात हा विवाह बेकायदेशीर आणि बालविवाह प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन करणारा असल्यामुळं पोलिसांनी दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. त्यात मुलगा-मुलगी, या दोघांचे पालक, मुलीचा मेहुणा, मंडप डेकोरेटर, पुजारी आणि लग्न सोहळ्याशी संबंधित असलेल्या दोघांचा समावेश आहे.

अनेक जिल्ह्यात अल्पवयीन मुलींचे विवाह : राज्यात बीडसह मराठवाड्यात तसेच पालघर, नंदुरबार, गडचिरोली आदी अनेक जिल्ह्यात अल्पवयीन मुलींचे विवाह होत असतात. ‘चाईल्डलाईन’ सारख्या संस्था अल्पवयीन मुला-मुलींचे विवाह रोखण्यासाठी भरपूर प्रयत्न करत असते. जनजागृतीची मोहीम राबवली जाते. परंतु, अजूनही सामान्यातल्या सामान्य घटकांपर्यंत ही जनजागृतीची मोहीम पोहोचलेली नाही, हे अल्पवयीन मुला-मुलींच्या विवाहाच्या वाढत्या संख्येवरून लक्षात येत आहे.

अल्पवयातील विवाह जीवावर बेतणारे : शासनानं विशेषतः महिला बालविकास विभागानं याबाबत मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. आदिवासी विभाग तसेच ग्रामीण भागात मात्र अजूनही अल्पवयीन मुला-मुलींचे विवाह रोखण्यात आणि त्यासंबंधीची जनजागृती करण्यात यश आलं नाही.

# सरकारी कामात अडथळा आणून शिपाई महिलेचा विनयभंग; आरोपी चालकास अटक

**मुंबई: विशेष प्रतिनिधी**

सरकारी कामात अडथळा आणत एका पोलीस शिपाई महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी एका २८ वर्षांच्या चालक आरोपीस आरसीएफ पोलिसांनी अटक केली. संदीप त्रिभुवनदास कनोजिया असे या आरोपीचे नाव असून अटकेनंतर त्याला स्थानिक न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली. ही घटना शनिवारी (ता. २९ जून) सकाळी ११.१५ वाजता चेंबूर येथील पांचरापोळ जंक्शन, वाहतूक शाखेजवळ घडली.

२९ वर्षांची तक्रारदार महिला नवी मुंबईतील उल्वे परिसरात राहत असून ट्रॉम्बे पोलीस ठाण्यात पोलीस शिपाई म्हणून कार्यरत आहे. शनिवारी सकाळी ती सहकाऱ्यासोबत वाहतूकीचे नियमन करत होती. सकाळी ११.१५ वाजता पोलिसांनी एका गाडीला थांबविले



होते. ही टुरिस्ट कार असल्याने चालकाला पोलिसांनी त्याच्या ड्रेसबाबत विचारणा केली होती. त्याला दंड भरण्यास सांगण्यात आले. त्याचा राग आल्याने त्याने तिच्यासह तिच्या दोन सहकाऱ्यांना अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. काही वेळानंतर आरोपीने तिची कॉलर पकडून तिच्या छातीला अश्लील स्पर्श करुन जोरात धक्का दिला होता. त्यामुळे पोलिसांनी त्याला बळाचा वापर करुन चौकशीसाठी ताब्यात घेतले. यावेळी त्याने मोठमोठ्याने आरडाओरड करुन तिथे गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला होता. तसेच पोलिसांच्या हातातील ई-चलन तोडण्याचा प्रयत्न केला. ही माहिती मिळताच आरसीएफ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. याप्रकरणी तक्रारदार महिलेच्या तक्रारीवरुन पोलिसांनी आरोपी संदीप कनोजिया याच्याविरुद्ध विनयभंगासह सरकारी कामात अडथळा आणून पोलिसांशी हुज्जत घालून धक्काबुक्की केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

# पालघरच्या औषध निरिक्षिकेने मागितली १ लाखांची लाच, लाच स्विकारताना खासगी इसम रंगेहाथ अटक

**वसई: विशेष प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्याच्या औषध निरिक्षाका आरती कांबळी यांच्यावर एका औषध




विक्रेत्याकडून १ लाखांची लाच मागितल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. लाचेची १ लाखांची रक्कम स्विकारतांना कांबळी यांच्या सहाय्यकाला रंगेहाथ अटक करण्यात आली आहे. गुन्हा दाखल होताच कांबळी फरार झाल्या आहेत. फिर्यादी ३२ वर्षीय औषध विक्रेता आहे. पालघरच्या औषध निरिक्षिका आरती कांबळी यांनी १४ जून रोजी तक्रारदार यांच्या मालकीच्या औषध दुकानाची (मेडिकल स्टोअर) ची तपासणी केली होती. त्यावेळी तक्रारदाराने त्याच्या औषध विक्री दुकानात औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्याचे उल्लंघन केल्याचे आढळले. त्यानंतर तक्रारदाराचे औषध विक्रीचे दुकान पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्याची नोटीस देण्यात आली होती. हे बंद ठेवलेले औषध विक्रीचे दुकान परत चालू करण्याकरता कांबळी यांच्या सांगण्यावरून कृष्णराम तिवारी या खासगी इसमाने तक्रारदाराकडे एक लाख रुपयाची लाचेची मागणी केली होती. आरती कांबळी यांनी दुजोरा दिल्यानंतर बुधवारी दुपारी दिडच्या सुमारास तिवारी याला रंगेहाथ पैसे स्विकारताना अटक करण्यात आली. गुन्हा दाखल होताच आरती कांबळी या फरार झाल्या आहेत. पालघरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक दयानंद गावडे, पोलीस निरीक्षक शिरीष चौधरी आदींच्या पथकाने ही कारवाई केली.

# शहापूरमध्ये परवानगीशिवाय मुलाच्या गुप्तांगाची शस्त्रक्रिया, पायाच्या शस्त्रक्रियेसाठी झाला होता रुग्णालयात दाखल

**शहापूर: विशेष प्रतिनिधी**

शहापूर उप जिल्हा रुग्णालयात एका नऊ वर्षीय मुलाच्या पायाच्या शास्त्रक्रियेबरोबरच त्याच्या गुप्तांगाची शस्त्रक्रिया पालकांच्या परवानगीशिवाय करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकारामुळे रुग्णाच्या आई – वडिलांनी चिंता व्यक्त केली आहे. दरम्यान, याबाबत नेमण्यात आलेल्या जिल्हास्तरीय चौकशी समितीचा अहवाल गुलदस्त्यात आहे. शहापुर तालुक्यातील सावरोली येथील नऊ वर्षीय आदिवासी मुलाच्या पायाला संसर्ग (इन्फेक्शन) झाले होते. त्याची शस्त्रक्रिया करण्यासाठी १५ जून रोजी त्याला शहापूर उपजिल्हारुग्णालयात दाखल करण्यात आले होते. १७ जूनला त्याच्यावर शस्त्रक्रिया



करण्यात आली. शस्त्रक्रिया करताना संबंधित डॉक्टरने पायाची शस्त्रक्रिया करण्याबरोबरच गुप्तांगाची शस्त्रक्रिया केल्याचा आरोप मुलाच्या आईने केला आहे. या गुप्तांगाची शस्त्रक्रिया करण्याबाबत संबंधित डॉक्टरने कुठल्याही प्रकारची आगाऊ सूचना किंवा आमची परवानगी घेतली नव्हती, असा आरोपही त्यांनी केला आहे.

या शस्त्रक्रियेमुळे मुलाच्या आई – वडिलांनी चिंता व्यक्त केली असून याबाबत चौकशीची मागणी केली आहे. तद्नंतर याप्रकरणी नेमण्यात आलेल्या चौकशी समितीने दोन दिवसांपूर्वी शहापूर उपजिल्हारुग्णालयाला भेट देऊन चौकशी केली असून त्याबाबतचा अहवाल गुलदस्त्यात आहे. चौकशी अहवालानंतर काय कार्यवाही होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या संदर्भात डॉ. अशिलाक शिंदे यांच्याशी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही. याबाबत रुग्णालय प्रशासनाशी संपर्क साधला असता, त्यांनी डॉ. अशिलाक शिंदे यांच्या नातेवाईकाचा मृत्यू झाल्याने ते अंत्यविधीसाठी गावी गेल्याचे सांगितले.

# फाशीची शिक्षा झालेल्या तरुणाच्या वर्तनाबाबतचा अहवाल सादर करा; उच्च न्यायालयाचे पोलिसांना आदेश

**मुंबई: विशेष प्रतिनिधी**

आईची हत्या करून तिचे अवयव भाजून खाल्ल्याप्रकरणी फाशीची शिक्षा झालेल्या तरुणाचा मानसिक आणि मानसशास्त्रीय अहवाल तसेच त्याच्या वर्तनाबाबतचा प्रोबेशन अधिकाऱ्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश उच्च



न्यायालयाने दिले आहेत. सुनील कुचकोरवी याला आईची निर्घृण हत्या केल्याप्रकरणी २०२१ मध्ये कोल्हापूर येथील सत्र न्यायालयाने दोषी ठरवून फाशीची शिक्षा सुनावली होती. ही शिक्षा कायम करण्याचे प्रकरण उच्च न्यायालयात दाखल आहे. याशिवाय, सुनील यानेही शिक्षेविरोधात अपील दाखल केले आहे. त्यावरील सुनावणीच्या वेळी न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या खंडपीठाने हे आदेश दिले. पोलिसांनी नोंदवलेल्या गुन्ह्यानुसार, २८ ऑगस्ट २०१७ रोजी कोल्हापूर शहर येथील माकडवाला वसाहतीत आईसह राहणाऱ्या सुनील याने तिची निर्घृण हत्या केली.

# तरुणीने AI चा वापर करत काढला मुलाचा आवाज, मैत्रिणीची केली फसवणूक

**भाईंदर: विशेष प्रतिनिधी**

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्याच मैत्रिणीला फसवणाऱ्या एका तरुणीला काशिगाव पोलिसांनी अटक केली आहे. आरोपी तरुणीने मुलाचा आवाज काढून फिर्यादी तरुणीला लाखो रुपये उकळले होते. मिरा रोड येथील एका उच्चभ्रू सोसायटीमध्ये राहणाऱ्या एनी दरमणी हिची याच इमारतीमध्ये भाडयाने राहण्यास आलेल्या रश्मी कर नामक तरुणीशी मैत्री झाली होती. दोन-तीन महिन्याच्या मैत्रीनंतर रश्मीने एनीला आपल्या मित्राच्या कार्यालयात चांगल्या पगारावर नोकरीला लावण्याचे आमिष दाखवले. यासाठी तिचा बायोडाटा व इतर कागदापत्रे घेतले.

काही दिवसांनी एनीला अभिमन्यू मेहरा नामक तरुणाचा फोन आला. एनीला नोकरी देणार असल्याचे त्या तरुणाने सांगितले. मात्र नंतर नोकरी ऐवजी व्यवसायामध्येच भागीदारी देऊ केली. या साठी एनीने ६ लाख ६० रुपये हे अभिमन्यूला ऑनलाइन पाठवले.



दरम्यान एनी अभिमन्यूकडे मागणी करू लागली. मात्र भेटण्यास सातत्याने नकार मिळू लागल्यामुळे तिच्या मनात संशय निर्माण झाला. याबाबतची तिने काशिगाव पोलिस ठाण्यात तक्रार दिली. सहाय्यक पोलीस निरीक्षक अभिजीत लोंढे यांनी तांत्रिक दुष्ट्या सखोल तपास सुरु केला असता येणारा दूरध्वनी हा रश्मीकडून येत असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे रश्मीची कसून चौकशी केल्यानंतर हा दूरध्वनी ती स्वतः करत असल्याचे तिने मान्य केले. त्यामुळे तीच्या विरोधात फसवणूक व इतर अन्य कलमा अंतर्गत गुन्हा दाखल केला असल्याची माहिती पोलिसाकडून देण्यात आली आहे. दूरध्वनीवर मुलाचा हुबेहूब आवाज काढण्यासाठी आरोपी रश्मीने कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) विकसित मोबाईल ॲपचा वापर केला असल्याचे तपासात समोर आले आहे. याशिवाय आपल्यावर संशय येऊ नये म्हणून दूरध्वनी करण्यासाठी बोगस सिमकार्डचा वापर केल्याची माहिती तपास अधिकारी अभिजीत लोंढे यांनी दिली आहे.

# गुटखा देण्यास नकार दिल्याने १७ वर्षांच्या मुलाची भोसकून हत्या, तीन संशयीतांचा शोध सुरू

**मुंबई: विशेष प्रतिनिधी**

गुटखा देण्यास नकार दिल्यामुळे मुलुंड परिसरात तीन अनोळखी व्यक्तींनी १७ वर्षीय मुलाची भोसकून हत्या केली. याप्रकरणी मुलुंड पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला असून आरोपींच्या अटकेसाठी चार पथके तयार करण्यात आली आहे. मोहम्मद हुसेन ताज हुसैन खान (१७) असे मृत मुलाचे नाव असून त्याचे चार मित्र मुलुंड पश्चिम येथील वसंत गार्डनवरील डोंगराळ भागात शुक्रवारी गेले होते. तक्रारीनुसार, तेथे त्यांना वाटेत तीन अनोळखी व्यक्तींनी अडवले व त्यांच्याकडे गुटख्याची मागणी केली. गुटखा नसल्यामुळे त्यांनी नकार दिला. गुटखा न दिल्यामुळे संतापलेल्या तीनही आरोपींनी सर्व मित्रांना मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी लाल रंगाचे टीशर्ट घातलेल्या व्यक्तीने चाकूचा धाक दाखवून हुसैन ताज खान यांच्याकडून पैसे काढून घेतले. त्याला विरोध केला असता आरोपीने खानच्या छातीत व पायावर चाकूने वार केले. गंभीर जखमी झालेला खान खाली कोसळला. त्याला अग्रवाल रुग्णालायात नेण्यात आले. तेथील डॉक्टरांनी खानला



मृत घोषित केले.

याप्रकरणाची पोलिसांना माहिती दिल्यानंतर त्यांनी अपमृत्यूची नोंद केली होती. पोलिसांनी खानचा मित्र अब्दुल हादी अन्सारी (१६) याचा जबाब नोंदवला. त्यावेळी त्याने घडलेला प्रकार पोलिसांना सांगितला. त्याच्या तक्रारीवरून याप्रकरणी तीन अनोळखी व्यक्तींविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी गुन्हे शाखाही समांतर तपास करीत आहे.

घडलेल्या प्रकाराची माहिती सर्व मुलांकडून घेण्यात आली असून ते भांडुप येथील रहिवासी आहे. डोंगराळ भागातील धबधब्यात भिजण्यासाठी ते जात असल्याचे त्यांनी सांगितले. आरोपींच्या वर्णनावरून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. त्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. प्राथमिक तपासात हल्लेखोर तरूण असून गुटख्यावरून वाद झाल्यानंतर आरोपींनी हल्ला केला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन उपायुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्तांनी घटनास्थळाला भेट देऊन याप्रकरणी तपासणी केली.

# पाच तरूणींचा विनयभंग करणाऱ्या रिक्षा चालकाला अटक

**मुंबई: विशेष प्रतिनिधी**

पाच तरूणींचा विनयभंग केल्याच्या आरोपाखाली २५ वर्षीय रिक्षा चालकाला शनिवारी पोलिसांनी अटक केली. पीडितांमध्ये दोन अल्पवयीन मुलींचा समावेश आहे. १५ वर्षीय मुलीच्या तक्रारीवरून याप्रकरणी विनयभंग व बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इतर चार पीडितांचाही आरोपीने विनयभंग केल्याचा आरोप आहे. रोहित भोसले (२५) असे अटक आरोपीचे नाव आसून तो कांदिवली पूर्व येथील रहिवासी आहे. पीडित तरूणी शिकवणीवरून शुक्रवारी घरी जात होती. त्यावेळी कांदिवली



पूर्वी येथील एव्हरशाईन क्राऊन इमारतीसमोर एक रिक्षाचालक वेडीवाकडी वळणे घेत रिक्षा चालवत होता. त्याने अचानक पीडित मुलीच्या शेजारी रिक्षा थांबवली आणि तिचा विनयभंग केला. दुपारी २ ते ७ यादरम्यान आरोपीने रिक्षातून जाताना आणखी चार तरूणींबरोबर गैरप्रकार केले. त्यात १७, २७, २६ व १९ वर्षांच्या तरूणींचा समावेश आहे. याप्रकरणी १५ वर्षीय पीडित मुलीने समता नगर पोलिसांकडे तक्रार केली असता पोलिसांनी विनयभंग व पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला. त्यानंतर सीसी टीव्ही कॅमेऱ्यातील चित्रणाच्या मदतीने आरोपीचा शोध घेऊन रात्री उशीरा भोसलेला अटक करण्यात आली.

# लक्ष्य शाळकरी मुले!

**पुण्यातील घटनेनंतर राज्यभरातील आणि त्यातही मुंबई महानगर प्रदेशातील बेकायदा पब, हॉटेल, हुक्का पार्लरवर कारवाईचा धडाका सुरू झाला. सध्या मुंबई, ठाणे, नवी मुंबई, मिरा-भाईदर, कल्याण-डोंबिवलीत एकामागोमाग एक बेकायदा हॉटेल, बार पाडले जात आहेत. गेल्या गेल्या चार-पाच वर्षांपासून ठाणे आणि परिसरातील तरुणाईला अमली पदार्थांचा कसा विळखा बसला आणि तो सोडविण्यात स्थानिक यंत्रणा कशा कुचकामी ठरल्या याच्या कहाण्या आता पुढे येत आहेत. ठाण्यापासून भिवंडी, अंबरनाथ, बदलापूरपर्यंत विस्तारलेल्या ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात पोलिसांनी गेल्या दीड वर्षात ६० कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले आहेत. यामध्ये गांजा, चरस आणि एमडी या अमली पदार्थांचा सर्वाधिक समावेश आहे. पण गेल्या पाच ते सात वर्षांत हे प्रमाण उघडकीस आले त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक असल्याचे माहीतगारांचे म्हणणे आहे.**



■ मुंबई: विशाल कारंडे

गेल्या काही वर्षांत ठाण्यात रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या पब, लेडीज बार, हुक्का पार्लर यांना अक्षरश: ऊत आला आहे. परमबीर सिंह यांच्याकडे ठाण्याचे पोलीस आयुक्तपद असताना हे प्रकार वाढीस लागले. आता तर कोठारी कंपाऊंडसारख्या परिसरात या धंद्यांची लांबलचक साखळीच उभी राहिली आहे. ठाणे महापालिकेत तर रात्रभर चालणाऱ्या पब, हॉटेलांना संरक्षण देणारी एक मोठी यंत्रणाच कार्यरत आहे. ठाणे शहरातील भाजप आमदार संजय केळकर गेली अनेक वर्षे शहरातील वाढत्या अमली पदार्थांच्या वापराविषयी कंठशोष करत आहेत. पण तरीही हे धंदे का थांबले नाहीत हा प्रश्न सुजाण ठाणेकरांना सतावतो आहे. ठाणे पोलीस आयुक्तालयात मोक्याच्या जागा मिळाव्यात यासाठी ठरावीक पोलीस अधिकाऱ्यांकडून केली जाणारी मोर्चेबांधणी आणि याच यंत्रणेचा या धंद्यांना असलेला आशीर्वाद आतापर्यंत सरकारी यंत्रणेला ठाऊक नव्हता का, हा खरा प्रश्न आहे. ठाणे शहरात मुंबई नाशिक महामार्ग, घोडबंदर, मुंब्रा बाह्यवळण, शिळफाटा अशा महत्त्वाच्या मार्गांचे जाळे आहे. ठाणे शहराला मिरा भाईंदर, नवी मुंबई, मुंबई ही शहरे जोडली जातात. त्यामुळे तस्करांना मुख्य मार्ग आणि महामार्गावरून सहज वाहनाने शहरात दाखल होता येते.

जिल्ह्यात अमली पदार्थ पोहोचविण्यासाठी पान टपऱ्या आणि महामार्गालगतच्या ढाब्यांचा वापर अधिक होत होता. या घटकांवर पोलीस, महापालिका कारवाई करतात. त्यापासून सुटका करून घेण्यासाठी अमली पदार्थांचा व्यापक करणारे म्होरके समाजमाध्यमांवर संदेश पाठवून कुरिअरच्या माध्यमातून अमली पदार्थांची वाहतूक करू लागले आहेत. ठाण्यातील सुशिक्षित तरुणांना कुरिअरद्वारे अमली पदार्थांच्या तस्करीप्रकरणी अटक झाली आहे.

समाजमाध्यमांवरून अमली पदार्थ मागविण्यासाठी परवलीचे शब्द वापरले जातात. तसेच रेव्ह पार्ट्यांच्या निमंत्रणासाठीदेखील वेगवेगळ्या आकृती, चित्रांचा वापर होत असतो. रेव्ह पार्टीच्या आयोजनाची माहिती विशिष्ट संदेश पाठवून दिली जाते. समजा, संदेशामध्ये वाघ, साप, जंगलाचे छायाचित्र असेल, तर ती पार्टी जंगलात आयोजित असेल. तसेच रशियन भाषेचादेखील मोठ्या प्रमाणात वापर होतो. उत्तर प्रदेश येथे एमडीची निर्मिती केली जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर ठाणे पोलिसांच्या पथकाने तेथे जाऊन ही प्रयोगशाळा उद्ध्वस्त केली होती. आरोपींमध्ये विज्ञान शाखेतील तरुणाचा सामावेश होता. एमडी पावडर तयार करण्यासाठी कोणत्या रसायनांचा वापर केला जातो याची माहिती त्याला होती. इतर काही राज्यांमध्येही अशा टोळ्या सक्रिय आहेत. त्या निर्जनस्थानी बंद कारखान्यांत, गोदामांमध्ये या प्रयोगशाळा सुरू करतात. जिथे पोहोचणे पोलिसांना कठीण असते. ३१ डिसेंबरच्या रात्री घोडबंदर भागात आयोजित एका रेव्ह पार्टीमध्ये पोलिसांनी १०० तरुणांना ताब्यात घेतले. ही मुले कॉलसेंटर, आयटी क्षेत्र किंवा विद्यार्थीदशेतील होती.

## ‘वाढवण’साठी स्वतंत्र पायाभूत सुविधा; पालघर जिल्ह्याचा आर्थिक स्तर तिपटीने वाढण्याचा दावा

■ पालघर: दिगंबर जाधव

वाढवण बंदराच्या उभारणीची निविदा येत्या दोन महिन्यांत प्रसिद्ध करण्यात येणार आहे. बंदर उभारणीसाठी सध्याच्या रस्त्यांचा वापर करण्याऐवजी स्वतंत्र मार्ग बांधले जाणार असून त्यासाठी भूसंपादन प्रक्रिया लवकरच सुरू केली जाणार आहे. या बंदरामुळे जिल्ह्यातील नागरिकांचे जीवनमान व आर्थिक स्थिती उंचावेल असा दावा जवाहरलाल नेहरू पतन प्राधिकरणाचे (जेएनपीए) अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी केला आहे.

वाढवण बंदराला केंद्रीय मंत्रिमंडळाने १९ जून रोजी मान्यता दिली आहे. त्यासाठी १२० मीटर रुंदीचे व ३३.६० किलोमीटर लांबीचे रस्ते बांधण्याची जबाबदारी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे सोपवण्यात आली आहे. रस्त्यांसाठी भूसंपादन प्रक्रिया तातडीने राबवण्यात येणार असून पुढील पावसाळ्यापर्यंत बंदराच्या नियोजित ठिकाणापर्यंत रस्ते उभारण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.



बंदराच्या उभारणीसाठी अनेक महत्त्वपूर्ण घटक, उपकरणे व साधनसामग्रीची आवश्यकता असून त्यांच्या उपलब्धतेसाठी अवधी आवश्यक आहे. हे लक्षात ठेवून येत्या दोन महिन्यांत निविदा प्रसिद्ध करून चार महिन्यांमध्ये ठेकेदार अंतिम करण्याच्या दृष्टीने ‘जेएनपीए’ वाटचाल करीत आहे. बंदराची प्रत्यक्ष उभारणी २०२५च्या पावसाळ्यानंतर हाती घेण्यात येईल असेही सांगण्यात आले. त्याचबरोबर बंदराच्या ठिकाणी पर्यावरणीय घटकांचा अभ्यास सुरू करण्याच्या दृष्टीने जबाबदारी विविध संस्थांवर सोपवण्यात येऊन त्याचे कामकाज लवकरच सुरू होईल, असे ‘जेएनपीए’च्या वाघ यांनी सांगितले. या बंदरामध्ये ९० टक्के स्थानिकांना स्थान देण्यात येणार असून स्थानिकांसाठी २७ क्षेत्रे निवडण्यात आली आहेत. ‘जेएनपीए’ने प्रकल्पाच्या जवळच्या १५ ते २० हजार तरुणांची शैक्षणिक माहिती संकलित केली असून त्यांना बंदरामध्ये काम करण्याच्या दृष्टिकोनातून कौशल्य विकास अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. याखेरीस परिसरातील तरुणांना अशा अभ्यासक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी संकेतस्थळामार्फत नोंदणी करण्याची सुविधा लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याचबरोबरीने बांधकामासाठी लागणारे साहित्य स्थानिकांकडून घेण्यात यावे यासाठीदेखील अभ्यास सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

वाढवण बंदर पूर्णपणे सुरू झाल्यानंतर यामुळे किमान एक कोटी रोजगार निर्मिती होईल असा विश्वास उन्मेष वाघ यांनीव्यक्त केला. या भागातील नागरिकांच्या आर्थिक स्तरांमध्ये झपाट्याने वाढ होऊन सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) तिप्पट होईल असा दावा त्यांनी केला आहे.

## भरधाव ट्रेलरने शाळकरी मुलांना चिरडले, एका विद्यार्थ्याचा मृत्यू; एक जखमी

■ बोईसर: गणेश बागडे

बोईसर चिल्हार रस्त्यावर भरधाव ट्रेलरने दोन शाळकरी विद्यार्थांना चिरडल्याची दुर्दैवी घटना घडली. या अपघातात एका शाळकरी विद्यार्थ्याचा मृत्यू झाला असून विद्यार्थिनी जखमी झाली आहे. जखमी विद्यार्थिनीवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून ट्रेलर चालकास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तारापूर एमआयडीसीला जोडणाऱ्या बोईसर चिल्हार रस्त्यावरील नागझरी येथे शुक्रवारी सकाळी लालोंडे येथील विद्या विनोद अधिकारी या शाळेत जाण्यासाठी पायी निघालेल्या चरी गावातील दोन विद्यार्थ्यांना पाठीमागून आलेल्या भरधाव वेगातील ट्रेलर ने धडक दिली. ट्रेलर च्या धडकेत निखिल काळूराम गिऱ्हाणे, वय १४ वर्षे या आठवीतील विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू झाला तर या अपघातात सोनाली



दांडेकर, वय १६ वर्षे ही दहावीत शिकणारी विद्यार्थिनी जखमी झाली असून तिच्यावर नागझरी येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातास कारणीभूत ट्रेलर चालकास मनोर पोलिसांनी ताब्यात घेतले असून याप्रकरणी पोलिस निरीक्षक सतीश शिवरकर हे अधिक चौकशी करीत आहेत. दरम्यान पालघरचे जिल्हाधिकारी डॉ. गोविंद बोडके यांना अपघाताची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळ आणि रुग्णालयात भेट देऊन पाहणी केली.

तारापूर औद्योगिक वसाहतीला जोडणारा बोईसर चिल्हार हा रस्ता वाहतुकीस अतिशय धोकादायक बनला आहे. रस्त्याचा असमतल पृष्ठभाग, तुटलेले दुभाजक, रखडलेले चौपदरीकरण, अनेक ठिकाणी गायब असलेल्या साईडपट्ट्या, सूचना फलकांचा अभाव या सारख्या अनेक तृटी असून सुरक्षित उपाय योजना आखण्यात एमआयडीसी चे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरीक करीत आहेत.

## चिमुकल्यांचा आक्रोश कुणी ऐकेल का?

■ नवी मुंबई: धनश्री सट्टा

नुकतेच १० वी आणि १२ वीचे निकाल लागले. या निकालानंतर विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे. राज्यात २० हून अधिक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. त्यात अनुत्तीर्ण झाल्यामुळे नाही तर चांगले गुण मिळाले नाही किंवा चांगल्या महाविद्यालयात प्रवेश मिळाला नाही म्हणून आत्महत्यांचे प्रमाण जास्त होते. या मुद्द्यावर कुठे चर्चा नाही की गांभिर्याने घेतलेला नाही. या चिमुकल्यांचा आक्रोशच कुणी ऐकनासं झालंय. काही वर्षांपूर्वी आर आर पाटील हे राज्याचे गृहमंत्री होते. त्यावेळी विद्यार्थ्यांच्या आत्महत्या होऊ लागल्या होत्या. आर आर पाटील यांनी त्याची गंभीर दखल घेतली होती. विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना घरी भेटी दिल्या आणि आत्महत्या रोखण्यासाठी विविध उपाययोजना आखण्यात आल्या होत्या. माध्यमांनी देखील हा मुद्दा गांभिर्याने हाताळला होता. मात्र कालांतराने सर्वच मागे पडलं. उपाययोजना कागदावर राहिल्या, माध्यमांनी फारशी दखल घेणं बंद केलंष्ठ हे सर्व थांबलं असलं तरी एक गोष्ट कधीच थांबली नाही किंवा कमी झाली नाही ती म्हणजे विद्यार्थ्यांच्या आत्महत्या. आजही त्या सातत्याने होत आहे. याची नव्याने चर्चा करण्याचो कारण म्हणजे नुकत्याच लागलेल्या १०वी आणि १२ वीच्या निकालानंतर विद्यार्थ्यांच्या होत असलेल्या वाढत्या आत्महत्या.राज्यात २० हून अधिक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यातही सर्वात धक्कादायक बाब म्हणजे केवळ अनुत्तीर्ण झाल्याने विद्यार्थ्यांनी आत्महत्या केलेल्या नाहीतर तर अपेक्षेप्रमाणे चांगले गुण मिळाले नाही, किंवा चांगल्या महाविद्यालयात प्रवेश मिळणार नाही अशा चिंतेमुळे नैराश्यग्रस्त होऊन विद्यार्थ्यांनी आत्महत्या



केल्या आहेत. हे सर्वात गंभीर आहे. अपयशामुळे नैराश्य येणं आणि आयुष्य संपवणं हा प्रकार नवा नाही. दरवर्षी निकालानंतर अशा बातम्या कमी अधिक प्रमाणात कानावर येत असतात. परंतु त्याकडे दुर्लक्ष करण्यात येते. मात्र आता हे प्रमाण कमालीचं वाढलं आहे. ही आकडेवारी कितीतरी पटीने अधिक असण्याची शक्यता आहे. ज्या नोंदी उपलब्ध आहेत त्यातून ही माहिती समोर आली आहे. अनेक ठिकाणी केवळ शालेय विद्यार्थ्यांची आत्महत्या अशीच नोंद आहे. १५ ते १७ वर्षांच्या विद्यार्थी नैराश्यामुळे आत्महत्या करत असतील तर हे नैराश्य शैक्षणिक अपयशातून आलेले असंत. या आत्महत्यांची कारणे पाहिलं तर मुले किती तणावात आहेत आणि त्यांच्यावर पालकांकडून अपेक्षांचे किती ओझं लादण्यात आले आहे, त्याची कल्पना येते. भाईदर मध्ये एक विद्यार्थांनी १२ वी उत्तीर्ण झाली. तिला ७८ टक्के गुण मिळाले मात्र अपेक्षप्रमाणे अधिक चांगले गुण न मिळाल्याने तिने आत्महत्या केली. ९ मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या दोन विद्यार्थ्यांनी वसईत आत्महत्या केल्या आहेत. चांगल्या करियरची अपेक्षा पालकांकडून मुलांवर लादल्या जात आहेत. त्यातून मग जीवघेण्या स्पर्धांमध्ये विद्यार्थी भरडले जात आहेत. शैक्षणिक अपयश म्हणजे सर्वकाही संपलं अशी भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होत आहे. त्यामुळे कोवळ्या वयातील मुले आपलं जीवन संपवत आहेत.

विद्यार्थ्यांना ताणतणावातून मुक्त करून त्यांचे समुपदेश करावे यासाठी राज्याच्या शिक्षण विभागाने ४१० समुपदेशकांची नियुक्ती केली आहे.

## बहुउद्देशीय इमारतीचा तिढा सुटण्याची चिन्हे, दोन वर्षांनंतर भोगवटा प्रमाणपत्र मिळणार

■ मुंबई: रघुवीर जाधव

वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमधील घाऊक फळ बाजारात उभारण्यात आलेल्या बहुउद्देशीय इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. मात्र त्याला अद्याप ओसी प्रमाणपत्र मिळाले नसल्याने इमारत वापरात आणता आलेली नाही. पुढील महिन्यात ओसी प्रमाणपत्र मिळण्याची अपेक्षा आहे, अशी माहिती फळ बाजार अभियंता यांनी दिली.

मार्च २०१२मध्ये या बहुउद्देशीय इमारतीचे बांधकाम सुरू करण्यात आले होते. हे काम जून २०१७



अखेर हे काम पूर्ण होणे अपेक्षित होते. आता काम पूर्ण होऊनही तंत्रिक बाबींमुळे ओसी प्रमाणपत्र रखडले होती. फळ बाजारात ७३२ मोठे गाळे तर २९७ लहान गाळे आहेत. मात्र वाढता वापर पाहता गाळ्यांची, वाहन पार्किंगची समस्या निर्माण झाली आहे. तसेच बाजार आवारात इतर कामांसाठी लागणारी कार्यालयीन जागा अपुरी पडत असल्याने बाजार समितीने आवारातच बहुउद्देशीय इमारत उभारण्याचे काम हाती घेतले होते. या बहुउद्देशीय इमारतीचे बांधकाम दोन वर्षांपूर्वीच पूर्ण झाले आहे.

## पनवेलमध्ये १ मेट्रीक टन प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त

■ पनवेल: सचिन कदम

पनवेल महापालिका मधील पनवेल, कामोठे, कळंबोली व खारघर या परिसरातून १ मेट्रीक टन वजनाच्या प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त केला असून ५५ हजार रुपयांचा दंड व्यापा-यांकडून वसूल केला आहे. मागील अनेक वर्षात एक मेट्रीक टन प्लास्टिक पिशव्या जप्त करण्याची पनवेल महापालिकेची ही पहिलीच वेळ आहे.

शासनाच्या निर्देशानंतर पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी प्लास्टिक पिशव्यांविरोधात कारवाई करण्याचे आदेश तीन दिवसांपूर्वी पालिका प्रशासनाला दिले. पालिका उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी पालिका क्षेत्रात सिंगल वापर करणा-या प्लास्टिकचा साठा करणा-या व्यापा-यांवर लक्ष केंद्रीत करण्याच्या सूचना आरोग्य निरिक्षकांना दिल्या. यानूसार खारघर प्रभाग समिती ‘अ ’ मध्ये ६४० किलो प्लास्टिक पिशव्यांचा वापर करताना आढळले. या प्लास्टिक पिशवी जप्त करुन त्यांच्याकडून आरोग्य निरीक्षक जितेंद्र मढवी, स्वच्छता निरीक्षक अतुल मोहोकर, संदीप भोईर, अजय ठाकुर, अतिक्रमण



विभाग व स्वच्छता दूत यांनी १० हजार रुपये दंड वसूल केला. तसेच प्रभाग समिती ‘ब’ मध्ये आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, स्वच्छता निरीक्षक अमोल कांबळे, हरेश कांबळे, अमित जाधव, दिग्नेश भोईर यांनी ९५ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले.

या व्यापा-यांकडून १५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. प्रभाग समिती ‘क’ कामोठे व ‘ड’ पनवेल शहरामध्ये पालिकेचे मुख्य आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, स्वच्छता निरीक्षक योगेश कस्तुरे, ऋषिकेश गायकवाड, अतुल वास्कर, महेंद्र भोईर, धनश्री पीवाल आणि कर्मचा-यांनी २६५ किलो प्लास्टिक जप्त करुन व्यापा-यांकडून ३० हजार रुपये दंड वसूल केला.

## हिवताप आणि डेंग्यूचे मुंबईत सर्वाधिक रुग्ण, दोन वर्षांत रुग्णसंख्येत मोठी वाढ

■ मुंबई: प्रथमेश चाव्हाण

पावसाळा सुरू झाल्यानंतर हिवताप व डेंग्यूच्या रुग्णांच्या संख्येत नेहमीच वाढ होत असली, तरी वर्षभर या आजारांचे रुग्ण सापडत असतात. गेल्या सहा महिन्यांत राज्यात आढळलेल्या हिवताप व डेंग्यूचे सर्वाधिक रुग्ण मुंबईत आढळून आले आहेत. या काळात शहरात हिवतापाचे १ हजार ९४६ तर डेंग्यूचे ३८९ रुग्ण सापडल्याने मुंबईकरांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. हिवताप व डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य सरकारकडून दरवर्षी विविध उपाययोजना राबविल्या जातात. असे असताना हिवताप व डेंग्यूच्या रुग्णांच्या संख्येमध्ये वाढ होत आहे. राज्यात गेल्या दोन वर्षांमध्ये हिवताप व डेंग्यूच्या रुग्णांच्या संख्येमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. हिवतापाचे २०२२ मध्ये १५ हजार ४५१, २०२३ मध्ये १६ हजार १५९ तर यंदा जूनपर्यंत ४ हजार ५२३ रुग्ण सापडले आहेत. यात मुंबईमध्ये सर्वाधिक १ हजार ९४६ रुग्ण आढळले




असून त्याखालोखाल गडचिरोलीत १ हजार ६५३, चंद्रपूरमधून २१६ आणि पनवेलमधून १५१ रुग्ण सापडले आहेत. गडचिरोलीमध्ये हिवतापाने तिघांचा मृत्यूही झाला आहे. तर २०२२ मध्ये राज्यात डेंग्यूचे ८ हजार ५७८, २०२३ मध्ये १९ हजार ३४ रुग्ण आढळले होते. यावर्षी आतापर्यंत २ हजार ८०२ रुग्णांना डेंग्यूची लागण झाल्याचे स्पष्ट झाले असून यातही मुंबईतच सर्वाधिक ३८९ रुग्ण आहेत. त्याखालोखाल पालघरमध्ये २२०, नाशिकमध्ये १९८, कोल्हापूरमध्ये १९२, रत्नागिरीत ११७ आणि नांदेडमध्ये १०१ रुग्ण सापडले आहेत. वर्धा जिल्ह्यात डेंग्यूने एकाचा बळी घेतला आहे. राज्यात हिवताप व डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जनजागृती करण्यावर भर देण्यात येत आहे. गणेशोत्सव व नवरात्रोत्सव मंडळांच्या माध्यमातून आजारांबाबत माहिती पोहोचवली जाते. प्रभात फेऱ्या, कार्यशाळा, प्रशिक्षण, भित्तीपत्रे, वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्यांच्या माध्यमातून जनजागृती करत असल्याचे आरोग्य सेवा विभागाचे सहसंचालक कैलास बाविस्कर यांनी सांगितले.

## पंतप्रधान आवास योजनेत पावणे आठ लाख घरे पूर्ण

■ मुंबई: सम्यक कासारे

पंतप्रधान आवास योजनेत राज्यातील ४०९ शहरांत १९ लाख ४० हजार घरे बांधण्याचे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले असले तरी आतापर्यंत फक्त आठ लाख ४२ हजार घरे पूर्ण झाली आहेत. ३१ मार्च २०२४ अखेरपर्यंत १६३० प्रकल्पात १३ लाख ६५ हजार घरांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी ११ लाख १६ हजार घरांचे प्रत्यक्ष बांधकाम सुरू झाले आहे. राज्यात सर्वसामान्यांसाठी परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याची जबाबदारी असलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने (म्हाडा) स्थापनेपासून नोव्हेंबर २०२३ पर्यंत पाच लाख पाच हजार ८०२ घरे बांधली आहेत. यामध्ये



पुनर्विकास प्रकल्पात मिळालेल्या घरांचाही समावेश आहे. २०२३-२४ या वर्षात म्हाडाने आतापर्यंत सर्वाधिक म्हणजे ११ हजार ७२५ घरांची निर्मिती केली. यामध्ये अत्यल्प उत्पन्न गटासाठी दहा हजार ४७१ घरे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. याशिवाय शहर व औद्योगिक विकास महामंडळाकडूनही (सिडको) राज्यात गृहनिर्माण प्रकल्प राबविले जात आहेत. स्थापनेपासून मार्च २०२४ पर्यंत सिडकोने दोन लाख सहा हजार १३२ घरे बांधली आहेत. नवी मुंबई (७४ हजार ६९२), नाशिक (२१ हजार ३४३), छत्रपती संभाजीनगर (१९ हजार ५०१) आणि नांदेड (सात हजार ७५८) या शहरात सिडकोने अत्यल्प तसेच अल्प उत्पन्न गटासाठी एक लाख २३ हजार २९४ घरांची निर्मिती केली आहे.

पंतप्रधान आवास योजना (नागरी) अंतर्गत सिडकोने २०२०-२१ पर्यंत १५ हजार ४३२ घरे बांधली होती. या योजनेत सिडकोसाठी ८६ हजार ९६१ घरांचे उद्दिष्ट असून त्यापैकी मार्च २०२४ अखेर सात हजार ८२१ घरे बांधून पूर्ण झाली असून ४४ हजार ८७३ घरांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत मार्च २०२४ पर्यंत दोन हजार ३५३ प्रकल्प पूर्ण झाले असून झोपडपट्टीत राहणाऱ्या दोन लाख ५७ हजार ४०३ कुटुंबीयांचे पुनर्वसन झाले आहे.